म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.



REFBK-0009400

# झाशीची संग्रामदेवता

दु. आ. तिवारी

७३८६५
८/३/६७

१९६६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३८६५ वि: काव्य
क्रमांक १९६६ नों. दि. ८/३/६७

# झांशीची संग्रामदेवता

कवि :

कै. दु. आ. तिवारी

प्रस्तावना :

डॉ. ल. म. भिंगारे, एम्. ए., पीएच्. डी.


REFBK-0009400

REFBK-0009400

रु. ८४.००

मराठी ग्रंथ संग्रहालय

ग्रंथालय

समृद्धी योजना

१९७०


चवी आवृत्ति

१५ ऑगस्ट १९५७

किंमत सव्वा रुपाया


स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर

प्रकाशक :

**दामोदर नारायण मोघे**, बी. ए.

स्कूल व कॉलेज बुकस्टॉल,

२९४ बी वॉर्ड, कोल्हापूर.

●

सर्व हक्क सुरक्षित

●

प्रकाशन–क्रमांक १२७

●

मुद्रक :

**गोविंद वामन कुलकर्णी**,

१६७ बी, सेवा मुद्रणालय,

कोल्हापूर.

# प्रकाशकाचे दोन शब्द–

मराठ्यांचा सर्व इतिहास–शिवकालापासून ते दुसऱ्या बाजीरावाच्या कालापर्यंतचा–ओजस्वी भाषेंत साकार करणारी कवि **तिवारी** यांचीं **' मराठ्यांचीं संग्रामगीतें '** ( आठवी आवृत्ति ) सुमारें तीन वर्षांपूर्वीं आम्ही वाचकांना सादर केलीं. तिवारी यांचें तितकेंच ओजस्वी दुसरें काव्य **' झांशीची संग्रामदेवता '** याची पांचवी आवृत्ति स्वातंत्र्यसमरशताब्दि–महोत्सवप्रसंगीं वाचकांचे हातीं देतांना आम्हांस धन्यता वाटते. हें काव्य म्हणजे राणी लक्ष्मीबाईच्या पराक्रमाचा नाट्यपूर्ण इतिहासच होय. राणीच्या पराक्रमाबद्दल ब्रिटिश सेनापति सर ह्यू रोज यानें लिहून ठेवलें आहे कीं ' The best **Man** upon the side of the enemy was the **Woman** found dead, the Rani of Zansi.' ( शत्रूच्या पक्षाचा **पुरुषोत्तम** म्हणजे मृतावस्थेंत सांपडलेली **अबला**–झांशीची राणी होय.)

अशा महान् पराक्रमी राणीच्या जीवनचरित्राचें पावित्र्य व तेज यांचें मनोहर शब्दचित्र अवघ्या एकादश गीतांत गुंफून तिवारींनीं महाराष्ट्र-रसिकांपुढें ठेविलें आहे. झांशीच्या स्वातंत्र्यलक्ष्मीची ही **एकादशपदी** मराठी वाचकांकडून आदरानें पूजिली जाईल असा आम्हांस पूर्ण विश्वास वाटतो.

आमचे स्नेही **डॉ. ल. म. भिंगारे** यांनीं–विनंति करतांच–वेळांत वेळ काढून उद्बोधक प्रस्तावना अल्पावकाशांत लिहून देऊन आम्हांस उपकृत केलें आहे.

सेवा मुद्रणालयाचे मालक, व्यवस्थापक व इतर कामगार यांनीं पुस्तक–छपाईचे कामीं जी तत्परता व आपुलकी दाखविली त्याबद्दल आम्ही त्यांचेहि आभारी आहोंत.

**स्वातंत्र्यसमरशताब्दि**
१५।८।५७

**– दा. ना. मोघे**

# —: अनुक्रम :—


| | |
|---|---|
| प्रस्तावना | पृ. १ ते ३० |
| झांशीच्या राणीचें संक्षिप्त चरित्र | ,, ३१ ते ४० |
| ' झांशीवर नौबत झडली ! ' | ,, १ ते ८ |
| ' आवडती माझी झांशी ' | ,, ९ ते ११ |
| ' मर्दानी झांशीवाली ' | ,, १२ ते २० |
| ' घनगर्ज ' | ,, २१ ते २४ |
| ' फेकला तटाहुन घोडा ! ' | ,, २५ ते २९ |
| ' झांशीची बीजन झाली ! ' | ,, ३० ते ३२ |
| ' सांभाळा ही तलवार ' | ,, ३३ ते ३६ |
| ' काल्पीस करी कल्पान्त ' | ,, ३७ ते ४३ |
| ' पळविला वीर विदुलेनें ' | ,, ४४ ते ४९ |
| ' राणीचा रणकल्लोळ ! ' | ,, ५० ते ५५ |
| ' शेवटची संगरलीला ' | ,, ५६ ते ६४ |

# प्रस्तावना

आज सरकारी इतमामानें, खाजगी उत्साहानें, इ. स. १८५७ ची शताब्दी साजरी करण्यांत येत आहे. अर्थात्च त्यावर्षी जें जें घडलें त्याविषयीं आदर दाखवावा, कृतज्ञता व्यक्त करावी हा या मागचा हेतु आहे. या समारंभांत भाग घेणाऱ्यांत, क्वचित् सर्वत्र दिसणाऱ्या कांहीं उत्सवमूर्ति असतील, सरकारी किंवा खाजगी समारंभांत हजेरी लावलीच पाहिजे असें वाटणारे कांहीं कर्तव्यनिष्ठ असतील, आणि मनुष्य हा उत्सवप्रिय प्राणी आहे या नियमाचे कांहीं पालनकर्ते असतील. तरीही एक गोष्ट निश्चित आहे कीं परकीय राजवटीच्या दडपणानें इ. स. १८५७ विषयीं स्पष्टपणें बोलणें- लिहिणें अवघड वाटतें म्हणून मुग्धता स्वीकारावी लागणें किंवा न पटणारीं मतें मांडावीं लागणें—ही परिस्थिति आतां उरलेली नाहीं. म्हणूनच या शताब्दीच्या उत्सवांतील औपचारिक आणि औपाधिक उत्साह वगळूनही असें म्हणावें लागेल कीं स्थूलमानानें इ. स. १८५७ मधील घटनांविषयीं आदराची कृतज्ञतेची भावना हीच आजची सर्वसाधारण प्रामाणिक भावना आहे. ही भावना आज दृढमूल होण्याला जीं अनेक कारणें पोषक ठरलीं त्यापैकीं एक महत्त्वाचें कारण म्हणजे परकीय इंग्रज इतिहासकारांनीं इ. स. १८५७ बद्दल घेतलेली ऐकांतिक भूमिका होय. या भूमिकेवरून या घटनांना ‘ शिपायांचें बंड ’ हें तुच्छतादर्शक नांव देण्यांत आलें, निरपराध स्त्रिया–मुलांच्या कत्तलीचीं भडक वर्णनें करण्यांत आलीं—आणि त्या सान्यांतून भारताची यथेच्छ बदनामी झाली—याची प्रतिक्रिया स्वातंत्र्याच्या कालांत होणें अगदीं नैसर्गिक आहे. पण ज्याप्रमाणें पन्नास वर्षांपूर्वीं, इ. स. १९०७ सालीं, केवळ ब्रिटिश राजवटींतच नव्हे तर खुद्द

ब्रिटिशांच्या मायभूमींत, याच घटनांना स्वा. सावकरांनीं ' स्वातंत्र्यसमर ' म्हणून गौरविलें आणि प्रबल सत्तेचा रोष पत्करला त्याचप्रमाणें लोकप्रियतेच्या प्रबल प्रवाहाविरुद्ध जाऊन आज प्रा. न. र. फाटकांसारखे विद्वान् इ. स. १८५७ मधील घटनांना ' बंडच ' म्हणावें लागेल असें विवेचन करीत असल्याचें वृत्तपत्रीय वृत्तांतावरून कळतें. म्हणूनच उत्सवाच्या क्षणैक भावनेंतून बाहेर पडून, शंभर वर्षांच्या कालांतरानें प्राप्त होणाऱ्या तटस्थ आणि ऐतिहासिक भूमिकेवरून इ. स. १८५७ मधील घटनांची प्रेरणा, प्रवृत्ति आणि परिणाम यांचा फेरविचार आवश्यक वाटतो.

इ. स. १८५७ मधील घटनांची फेर–तपासणी करणाराला प्रथमतःच जाणवणारी अडचण साधनांची आहे. एतत्संबंधींचें विवेचन करणारे बहुतेक सर्व ग्रंथ इंग्रजी लेखकांचे—म्हणजेच या घटनांत ओढलेल्या एका पक्षाचे आहेत. त्यांत पक्षनिष्ठ दृष्टि भरपूर आहे. त्यांतील सत्यासत्याचा निर्णय करण्याला उपयुक्त ठरतील असें विरुद्ध बाजूचें म्हणजे देशी पक्षाचें अत्यल्प लेखन उपलब्ध आहे. मराठींतील एकुलता एक समकालीन ग्रंथ म्हणजे श्री. चिं. वि. वैद्य यांनीं प्रसिद्ध केलेला, विष्णुभट गोडसे वरसईकर यांचा " माझा प्रवास " हा ग्रंथ होय. म्हणूनच या महोत्सवाच्या ऐन धामधुमींतहि म. म. दत्तोपंत पोतदारांसारखें इतिहास-संशोधक साधनांच्या प्रसिद्धीची मागणी करतांना आढळतात. हीच मागणी त्यांनीं सतरा वर्षांपूर्वीं वि. वा. हडप यांच्या एतद्विषयक ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत केली होती. एवंच इ. स. १९४० ते १९५७ या कालांत इंग्रजी राजवट जाऊन ' देशी ' स्वराज्य आलें तरी अभ्यासकांच्या अडचणी कमी झालेल्या नाहींत. सध्यां उपलब्ध असलेली बहुतेक सामुग्री ब्रिटिश राजवटींतीलच आहे; व तीवरून अनुमानें काढावयाचीं म्हटल्यास इ.स.१८५७ मधील घटनांबाबत एकंदर तीन विचारप्रणाली आढळून येतात

असें दिसतें:— (१) आज सर्वांत लोकप्रिय ठरलेली स्वातंत्र्य-समरवादी विचारप्रणाली. (२) इ. स. १९४० मध्यें श्री. वि. वा. हडप यांनी मांडलेली व म. म. पोतदारांनीं मार्क्स-दार्शनिकांची म्हणून उल्लेखिलेली विचार-प्रणाली; आणि (३) तोंडावळ्यानें ब्रिटिश इतिहासकारांसारखी दिसणारी पण आज नव्यानें मांडण्यांत येत असलेली वंडाची विचारप्रणाली:—

यांपैकीं अजून पुरेशा विस्तृतपणें प्रसिद्ध न झालेल्या शेवटच्या विचारप्रणालीसंबंधीं इतकेंच म्हणतां येईल कीं तिच्या केवळ तोंडवळा ब्रिटिश इतिहासकारांच्या विचारमंथनासारखा आहे एवढ्याच कारणासाठीं तिचा अधिक्षेप करणें योग्य होणार नाहीं. त्याचप्रमाणें मार्क्सवादी विचार-सरणी ही तशी आहे म्हणून एकदम स्वीकार्य ठरत नाहीं तशीच एकदम टाकावूहि ठरत नाहीं. आजची लोकप्रिय स्वातंत्र्यसमरवादी विचारसरणी घेतली तरी ती केवळ ऐतिहासिक विवेचनांतून उद्भवली आहे असें म्हणतां येणार नाहीं. या विचारधारेचे उद्गाते स्वा. सावरकर यांची सारी हयात राजकारणानें व्यापलेली आहे. आणि स्वतःच्या राजकीय ध्येयाच्या साध्यास उपयुक्त, प्रेरक म्हणूनच प्रथमतः सावरकरी विचारधारा जन्माला आली हें विसरतां येणार नाहीं. म्हणूनच या तिन्ही विचारप्रणालीविषयीं कोणताहि ग्रह-पूर्वग्रह मनांत न आणतां विचार करणाऱ्यांस प्रथमतः इ. स. १८५७ मधील घटनांविषयीं एकमत कोठें होतें व मतभेदास आरंभ कोठें होतो याचा शोध घ्यावा लागेल.

इ. स. १८५७ मधील घटनांचा आरंभ झाला काडतुसांना लावण्यांत येणाऱ्या चरबीच्या प्रकरणानें व त्या चरबीला चिकटलेल्या धार्मिक भावनेमुळें असें आतां शालेय इतिहासकारसुद्धां मानणार नाहीं. या असंतोषाचीं मुळें खोलवर रुजलेलीं होतीं. खुद्द पक्षपाती इंग्रज-लेखकांनीं-सुद्धां या खोलवरच्या असंतोषाला मान्यता दिलेलीच आहे. ‘हिस्टोरियन्स

हिस्टरी ऑफ दि वर्ल्ड' (भाग २२) मध्यें हिंदी बंडाचा म्हणून देण्यांत आलेला वृत्तांत पूर्णपणें इंग्रजधार्जिणा आहे त्यांतहि या बंडाच्या प्रेरणा (Motives) म्हणून उल्लेखिल्या आहेत त्यांतील पाहिलीच अशी, कीं "सगळ्या भारतीयांचें मन विचलित झालें होतें आणि कसल्याहि भरमसाट गोष्टींवर विश्वास ठेवून, भीतीनें वाटेल तसें ते वागत होते हेंच खरें दिसतें." (The truth seems to be that native opinion throughout India was in a forment predisposing men to believe the wildest stories and to act precipitately upon their fears.) पण लोकांचा या भरमसाट गोष्टींवर विश्वास तरी कसा बसत होता? खुद्द चरबी प्रकरणाकडेच पाहिलें तर असें दिसेल कीं काडतुसांना गायीची किंवा डुकराची चरबी लावण्यामागें आपल्या धर्मावर घाला घालण्याचा इंग्रजांचा बेत आहे असें हिंदु-मुसलमान शिपायांना वाटलें तें आपाततः नाहीं. स्वा. सावरकरांनीं एका अलीकडील लेखांत रे. केनेडी या मिशनऱ्याचा जो उतारा दिला आहे त्यांत तो म्हणतो: 'आपण आपल्या सर्व शक्तीचा आणि सत्तेचा उपयोग करून हिंदुस्थान हें पूर्वेकडील ख्रिस्तीकरणाचें केंद्र केलें पाहिजे.' (We must use all the power and all the authority in our hands ..until India becomes the bulwork of Christianity in the East.) या उद्गारांतील प्रचारकी अतिशयोक्ति वगळूनसुद्धां असें म्हणावें लागेल कीं धार्मिक असंतोषाची कल्पना ही केवळ काडतुसाच्या चरबीला चिकटलेली किंवा सैन्यापुरती मर्यादित असण्याचें कारण नव्हतें. किंबहुना इ. स. १८५८ सालच्या राणीच्या जाहिरनाम्यानें सरकार लोकांच्या धार्मिक समजुतींत ढवळाढवळ करणार नाहीं असें जाहीर झाल्यानंतर देखील मिसेस् मुलेन्स्सारख्या मिशनरी बाया सारें हिंदुस्थान इंग्रजी वळणावर जाण्याच्या गोष्टी लिहीत होत्या. अर्थात् १८५७ च्या उठावाचें याहून मूलभूत कारण हें डलहौसीच्या कारकीर्दींत आढळतें.

वस्तुतः वेलस्लीच्या तैनाती फौजेच्या योजनेपासूनच इंग्रजी राजसत्तेचें स्वरूप स्पष्ट व्हावयास लागलें होतें. डलहौसीनें संस्थानें खालसा करून किंवा दत्तक नामंजूर करून मुलूख जोडण्याचा जो सपाटा लावला तो वेलस्लीपासून चाललेल्या धोरणाचा परिपाक होता. परंतु डलहौसीनें केलेल्या गोष्टी या एकदम झपाट्यानें डोळ्यांत भरणाऱ्या होत्या एवढेंच. डलहौसीच्या या धोरणाला किंवा एकंदरीत त्या काळपर्यंतच्या ब्रिटिश कायदेकानूंना कोणी 'प्रगतिपर' ( enlightened legislation ) म्हणून गौरवतो, कोणी कांहीं विशिष्ट उदाहरणांत तरी ब्रिटिशाचें चुकलें असें म्हणतो. तेव्हां इ. स. १८५७ सालच्या घटनांची प्रेरणाही तात्कालिक नव्हती, खोलवर रुजलेल्या असंतोषांतून ती मिळाली होती इतकी या प्रकरणींची सर्वसाधारण भूमिका म्हणतां येईल. पण या खोलवर रुजलेल्या असंतोषाचा तपशील कोणता—त्याचा अन्वयार्थ काय लावावयाचा हें ठरवितांना मात्र मतभेदाला वाव मिळून त्यांतून पूर्वीं उल्लेखिलेल्या तीन वेगवेगळ्या विचारप्रणाली उद्भवतात.

प्रथमतः स्वा. सावरकरांची विचारसरणी पाहूं. त्यांच्या अलीकडच्या एका लेखाच्या मथळ्यांत म्हटल्याप्रमाणें "हें धर्मयुद्ध नि स्वातंत्र्ययुद्धच होतें" हें त्यांच्या विचारसरणीचें किंवा आजच्या लोकप्रिय विचारसरणीचें सार म्हणतां येईल. काडतूस-चरबी प्रकरणांत किंवा रे. केनेडीच्या उद्गारांत दिसून येणाऱ्या भागाला 'धार्मिक' म्हणावेंच लागेल. त्याचप्रमाणें दिल्लीचा बहादुरशहा, नानासाहेब पेशवे किंवा झांशीची राणी प्रभृतींच्या कांहीं उद्गारांतून स्व-राज्य कल्पनेचाही भाग दाखवून देतां येईल. पण तेवढ्यावरून 'धर्मयुद्ध नि स्वातंत्र्य युद्ध' असा वाक्प्रयोग पत्करण्यापूर्वीं कांहीं विसंगति-शंका यांचा उलगडा करतां आला पाहिजे—१८५७ च्या उठावांत भाग घेणाऱ्या निरनिराळ्या नेत्यांच्या उद्गारांत जी स्व-राज्याची

कल्पना अनुस्यूत होती ती एकच किंवा निदानीं एकसंच होती काय? बहादुरशहा आणि नानासाहेब किंवा रावसाहेब हे कोणाचें 'स्वराज्य' आणणार होते? दिल्लीची मोंगल पातशाही पुनः उभी रहाणार होती कीं पुण्याची पेशवाई?–या दोहोंमध्यें एकात्मकता येण्याचा काय संभव होता? १८५७ मधील हिंदी सैनिकांची एक घोषणा "खुल्क खुदाका, मुल्क बादशहाका, और अमल राणी लछ्मी बाईका" अशी होती. उलट ग्वाल्हेरीस गेल्यानंतर पेशव्यांनीं स्वतःस राज्याभिषेक करून घेतला किंवा निदानीं पेशवाईचीं वस्त्रें धारण केलीं. – या दोहींचा अन्वयार्थ कसा लावावयाचा? बहादुरशहाची मोंगली राजवट पुनः येणार असें घोषणेच्या अनुरोधानें म्हणावें तर पेशव्यांच्या ग्वाल्हेरीच्या कृत्यास अर्थ रहात नाहीं; आणि पेशव्यांच्या कृत्यास कांहीं अन्वयार्थ असल्यास मुल्क बादशहाका व अमल राणी लछ्मीबाईका या दोन्हींना कांहीं अर्थ उरत नाहीं. हीं कृत्यें किंवा घोषणा या केवळ लढाईतील उत्तेजनासाठीं होत्या किंवा त्यांत राजकीय डावपेच होते असें म्हणून समर्थन करावयाचें म्हटलें तरी या डावपेंचांच्या, उत्तेजनाच्या मागची मूळ वस्तु कोणती तें स्पष्ट करून सांगता आलें पाहिजे. उदाहरणादाखल बहादुरशहा, पेशवे आणि झाशींची राणी या तीन व्यक्तीच घेतल्या तरीं त्यांचे परस्परसंबंध कोणत्या रीतीचे रहाणार होते याचा उलगडा व्हावयास हवा. एकदां खुद्द पेशव्यांनीं शाहू महाराजांकरितां आणि दुसऱ्यांदा महादजी शिंद्यांनीं पेशव्यांकरितां दिल्लीच्या बादशहाकडून वस्त्रें व सनदा आणल्या त्या चालीवर बहादुरशहाला गादीवर ठेवून पेशवे कारभार हाकणार होते काय? – आणि बादशहा आणि पेशवे यांच्या या संबंधामुळें या उभयतांपेक्षां अधिक पराक्रमी ठरलेली झाशीची राणी तिसऱ्या रांकेंत जाऊन बसणार होती काय? म्हणजेच या उठावांतील स्वराज्य किंवा स्वातंत्र्य कल्पनेंत नेमकें कोणाचें राज्य अपेक्षित होतें तें उलगडत नाहीं असें म्हणावें लागेल.

याहीपेक्षां बोचणारी कल्पना आहे ती धर्मयुद्धाची. ख्रिस्ती धर्माचा उघड प्रचार करणारे मिशनरी आणि त्यांना प्रच्छन्नपणें साहाय्य करणारे चरबी-काडतूसवाले इंग्रज अधिकारी यांच्याविरुद्ध हा उठाव होता म्हणजेच ख्रिस्ती आक्रमणाविरुद्ध हा उठाव होता–येथपर्यंतच्या विवेचनाचा रस्ता सरळ दिसला तरी विवेचनाचा हा भाग अकरणरूपी आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. हें आक्रमण हाणून पाडण्यास सिद्ध झालेल्यांच्या करणरूप धर्मकल्पना कोणत्या ? ज्या एकीनें हा उठाव झाला त्या एकीची या धर्मकल्पनांशीं सांगड कशी घालतां येते ? ख्रिस्ती आक्रमणाविरुद्ध लढणारे बहादुरशहा आणि पेशवे हे नेमके कोणाच्या रक्षणासाठीं लढत होते ? पेशव्यांनीं नेपाळच्या प्रधानांना हिंदु म्हणून लिहिल्याचें स्वा. सावरकर सांगतात, तर दिल्लीच्या बादशहाचें इराणच्या शहाबरोबर कारस्थान चालू होतें असें इंग्रज इतिहासकार म्हणतात. तेव्हां पेशवे धर्मरक्षण करणार होते हिंदूंचें आणि बादशहा मुसलमानांचें. फिरंग्याविरुद्ध उठाव करण्या-साठीं एकत्र आलेल्या या हिंदु–मुसलमानांचें धर्मकल्पनाबाबत कितपत सूत होतें ? इंग्रजी राजवटीपूर्वीचा सारा इतिहास पाहिला तर त्यांत हिंदु-मुसलमान झगड्याचा भाग दिसेल. ख्रिस्ती प्रचार कितीहि विषारी किंवा सूक्ष्म असला तरी तो मोंगली जिझिया करासारखा डोईजड किंवा तरवारीच्या धारेसारखा तीव्र झाल्याचें दाखवतां येणार नाहीं. तेव्हां ख्रिस्ती आक्रमणाविरुद्ध एकत्र होणारे धर्मकल्पनांबाबत अहिनकुलवत् होतें हें विसरून या उठावाला धर्मयुद्ध म्हणतां येईल काय ?

धर्मयुद्ध आणि स्वातंत्र्ययुद्ध या दोन्ही कल्पनांबाबत संयुक्तपणें येणारी शंका म्हणजे या उठावांत भाग घेणारे जसे हिंदु–मुसलमान दोघेही होते तसेच या उठावांत इंग्रजांच्या बाजूनें लढणारेही हिंदु–मुसलमान होते, त्यांची वाट काय ?—खुद्द पेशव्यांनीं उठाव केल्यावर त्यांनींच निर्माण

केलेले शिंदे–होळकर त्यांना मिळण्याऐवजीं इंग्रजनिष्ठ कसे आणि कां राहिले ? जयाजी शिंदे ग्वाल्हेराहून गेले ते आग्र्यास इंग्रजांच्या आश्रयासच ना ? आणि दक्षिणेंत हैद्राबादेंत निजाम होता तो मूळचा दिल्लीच्या बादशहाचा सुभेदार–त्याला बहादुरशहाच्या उठावाची मातब्बरी वाटली नाहीं–त्याच्या पलटणी इंग्रजांच्या दिमतीस आल्या याचें कारण काय ?–स्वराज्य किंवा स्वातंत्र्य ही व्यापक कल्पना सोडाच–पण स्वधर्माची कल्पना तरीं खरोखरी सर्वांना आकर्षू शकली काय ? म्हणूनच स्वधर्म आणि स्व–राज्य यांचे अर्थ बहादुरशहा, पेशवे, झाशीची राणी या प्रत्येकाच्या बाबत एकच एक होते हा आग्रह टिकण्यासारखा नाहीं.

हें म्हणणें अधिक स्पष्ट होण्यासाठीं उपरोक्त तीन व्यक्तीपुरतांच, त्यांचा इ. स. १८५७ च्या उठावापूर्वींचा इतिहास पाहूं. बहादुरशहाची तरुण पत्नी झीनतमहाल हिच्या प्रेरणेनें, आपल्या मुलांपैकीं वयानें आणि क्रमानें राज्याधिकाराला पात्र होणारे राजपुत्र बाजूला सारून आपले सर्व अधिकार–संपत्ति झीनतमहालच्या अल्पवयी मुलाला मिळावेत अशी खटपट बहादुरशहानें चालवली होती. आणि खटपट म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून कंपनीच्या अधिकाऱ्यांचें मन वळवण्याचा प्रयत्न होय. दुसऱ्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याला देण्यांत येणारे पेन्शन इंग्रजांनीं बंद केलें तें पुनः चालू व्हावे ही नानासाहेब पेशव्यांची इच्छा व त्यासाठीं खटपट करण्यासाठीं त्यांनीं अझिमुल्लाखानास विलायतेस पाठविलें. झाशीचे राजे गंगाधरराव मरण पावल्यानंतर डलहौसीनें झाशीचें संस्थान खालसा केलें. तो हुकूम रद्द होऊन दत्तक मान्य व्हावा व झाशीची गादी चालू रहावी ही राणी लक्ष्मीबाईची खटपट होती. राणी लक्ष्मीबाईचें चरित्र रा. ब. पारसनीसांनी इंग्रजी राजवटींत लिहिलेलें म्हणून त्यांतील अनुमानें मानावयाची नाहींत म्हटलीं तरी निदानीं कागदोपत्रीं पुरावा नाकारतां

येणार नाहीं. प्रथमतः गव्हर्नर जनरलकडे आणि नंतर विलायतेस राणी लक्ष्मीबाईनीं जीं निवेदनें पाठवलीं त्यांत झाशीच्या व इंग्रजांच्या पूर्वापार स्नेहसंबंधाचा आवर्जून उल्लेख केला आहे; दत्तक–मान्यता ही जुन्या तहाच्या कलमांस धरून कशी ठरेल याबद्दल विवेचन आहे व आपल्या राजनिष्ठेची ग्वाही दिली आहे. या तिघांच्याच काय पण अनेकांच्या बाबत असें दिसतें कीं प्रत्यक्ष इ. स. १८५७ चा उठाव होईपर्यंत अनेक संस्थानिक–जहागीरदार–ज्यांना ज्यांना डलहौसीच्या खालसा धोरणाचा ( lapse policy ) चटका बसला होता, ते सर्व प्रथमतः आपली राजनिष्ठा व तिचा बावनकशीपणा सिद्ध करण्यांत एकमेकाशीं स्पर्धा करीत होते. त्या प्रयत्नांत यश येत नाहीं हें निश्चित झाल्यानंतरच ही मंडळी उठावाच्या दिशेकडे तोंड वळवूं लागली. अर्थात्‌च या मंडळींचेंच दुखावलेलें ‘ स्व ’ हें संकुचित, आत्मलक्षी होतें. स्वराज्य म्हणजे ‘ माझें राज्य ’ एवढाच अर्थ अपेक्षित दिसतो. मग तें राज्य मांडलीकीचें असलें तरी चिंता नव्हती. क्षणभर असें समजूं कीं झाशीचा दत्तक मान्य झाला असता किंवा नानासाहेबाला पेन्शन चालू झाले असतें, किंवा झीनतमहालचा मुलगा हाच बहादुरशहाचा अधिकृत वारस ठरला असता तर या मंडळींनीं उठावांत भाग घेतला असता काय ? या साऱ्यांच्या वैयक्तिक इतमामावर जी गदा आली होती तीमुळेंच ही मंडळी खवळली आणि याच अर्थानें ‘ हा उठाव सरंजामदारांचा होता व इतर लोक त्यांत ओढले गेले होते’ या हडपांच्या अनुमानाला आधार मिळतो.

परंतु त्या बरोबरच हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं हा प्रसंग १८५७ मधला आहे. तत्कालीन परिस्थितींत स्वराज्याचा अर्थ कोणता होता व त्याची व्याप्ति काय होती याचा विचार केल्याशिवाय हडपांच्या अनुमानानें गांठलेलें दुसरें टोंक स्वीकारणें धोक्याचें ठरेल. इ. स. १८५७ नंतर वीस–पंचवीस वर्षांनीं ‘ देशोन्नति ’ या विषयावर लिहितांना कै. विष्णुशास्त्री

चिपळूणकरांनीं आपल्या लोकांमध्यें ‘ राष्ट्रीय ’ भावनेचा अभाव असल्याची तक्रार केली होती. तेव्हां इंग्रजी विद्येच्या प्रसारानें नंतर प्रसृत झालेल्या राष्ट्र–राष्ट्रवाद या कल्पनासुद्धां इ. स. १८५७ च्या काळांत बहुतांशीं अपरिचित होत्या असें म्हणावें लागेल. बहुतांशानें म्हणण्याचें कारण एवढेंच कीं एखादा राजा राममोहनराय किंवा लोकहितवादी थेट लोकांच्या पार्लमेंटची कल्पना-सुद्धां लिहून गेला होता. पण त्या गोष्टीचा प्रसार ध्यानांत धरण्याइतका झाला नव्हता. इ.स.१८५७ च्या वेळची परिस्थिति पाहिली तर असें दिसतें कीं, इंग्रजी सत्तेचीं केंद्रें आणि त्याचप्रमाणें विद्याप्रसाराचीं केंद्रें ही मुंबई, कलकत्ता, मद्रास हीं होतीं. तर उठावाचीं केंद्रें बहुतांशीं उत्तरहिंदुस्थानांत होतीं. त्यांचा थोडासा संबंध कलकत्त्याशीं लावतां येईल पण मुंबई–मद्रास भाग उठावापासून बहुतांशीं अलिप्त होता. अशा स्थितींत राष्ट्रवादाची कल्पना पचनीं पडण्याच्या आधीच्या काळांत राज्यांत बदल घडण्याची एकच एक जुनी–तिला सरंजामी म्हणावें हवें तर–कल्पना म्हणजे एक राजा जाऊन त्याच्या जागी दुसरा येणें ही होती. म्हणूनच इंग्रज राज्याच्या जागीं बहादुरशहा किंवा पेशवे यांपैकीं कोणी तरी पुढाकार घेतला तर लोकांना या बदलाबद्दल आकर्षण वाटणें शक्य होतें. राजघराण्याबद्दलचें किंवा राजयंत्राशीं वंशपरंपरेनें निगडित असलेल्या लोकांबद्दलचें हें प्रेम इ. स. १८५७ सालीं दिसलें तर त्यांत हिणवण्यासारखें कांहींच नाहीं; कारण आज शंभर वर्षांनंतर लोकशाहीच्या काळांत, शिक्षणप्रसारानें बुद्धीचीं, मनाचीं क्षितिजें विस्तारलीं असें म्हणतात त्या काळांत आम्ही काय केलें आणि करीत आहोंत ?– म्हैसूरच्या महाराजांनाच राज्यपाल म्हणून ठेवण्याचा आग्रह धरिला–निवडणुकीसाठीं उमेदवार निवडतांना त्यांची कुलप्रतिष्ठा जातिमहात्म्य इत्यादि सान्यांचा राजरोस उल्लेख करीत आहोंत–तरी आमची लोकशाही खरीच ठरते. तर केवळ १८५७ च्या जुन्या जमान्यांतले नेते ‘ सरंजामदार ’ होते एवढ्यावरून तो उठाव

स्वातंत्र्ययुद्ध नव्हतें असें कसें म्हणतां येईल? त्यांच्या वैयक्तिक अपेक्षा-भंगानें त्यांना या लढ्याकडे वळविलें असलें तरी त्यांत बिघडलें कुठें? एका प्रबल राजसत्तेशीं लढा देतांना कोणत्याहि कारणानें तिच्याविरुद्ध असलेल्या शक्ति एकत्रित करणें, त्यांचा चतुराइनें उपयोग करणें यांत राजकारणाच्या नीतीला सोडून काय आहे? अशा या परस्परविरुद्ध मीमांसेला कारणीभूत होणारा पुरावा जोपर्यंत अधिक स्पष्ट होत नाहीं तोपर्यंत ही मीमांसा अनिर्णित आहे असें म्हणण्याशिवाय गत्यंतर नाहीं. फार तर आणखी असें म्हणतां येईल कीं ही दोन्हीं १८५७ वरचीं भाष्यें आहेत आणि भाष्यात्मक इतिहास हाच आज इतिहास म्हटला जातो.

दुसरा एक विचार असा संभवतो कीं प्रेरणेच्या दिशेनें १८५७ चा निर्णय करण्याला अडचणी असल्या तरी निदानीं परिणामांच्या दिशेनें कांहीं सुगावा लागतो काय तें पहावें. या परिणामांचा विचार करतांना दोन स्पष्ट खंड पडतात. इ. स. १९०७ सालीं स्वा. सावरकरांनीं १८५७ च्या उठावाचा स्वातंत्र्य-समर म्हणून गौरव केला तेव्हांपासून क्रांति-कारकांच्या कक्षेंत १८५७ ही स्फूर्तीची गंगा झाली होती. सावरकरांच्या पिढींतील महाराष्ट्र, बंगाल, पंजाब इत्यादि क्षेत्रांत क्रांतिकारी प्रयत्न करणारे हे १८५७ चा वारसा सांगत आले. थेट सुभाषबाबूंच्या आझाद हिंद फौजेपर्यंत हें लोण पोंचलें होतें असें म्हणतां येईल. म्हणजे एका अर्थानें १८५७ चे स्वराज्याभिमुख परिणाम इ. स. १९०७ नंतरच स्पष्टपणें दृग्गोचर झाले असें म्हणावें लागेल. स्वा. सावरकरांच्या त्यावेळच्या ( १९०७ ) घोषणेंत १८५७ सालीं सुरूं झालेलें स्वातंत्र्य–युद्ध अजून चालूं आहे व तें स्वराज्य मिळेपर्यंत चालूं रहाणार अशा आशयाचा जो भाग होता तो उत्तेजक, काव्यात्म उक्ती म्हणून स्फूर्तिदायक ठरणारा होता यांत संशय नाहीं. पण वस्तुस्थितीची नोंद म्हणून हें ध्यानांत ठेवलेंच पाहिजे कीं १८५७ चें काव्यमय स्फूर्तिदायक ओजस्वीकरण

१९०७ नंतरचें आहे. आधींच्या काळाकडे मागें वळून पहाणाऱ्यास हें मान्य करावें लागेल कीं १८५७ च्या उठावाचा शेवट इंग्रजांच्या विजयांत झाला व त्याचा पहिला परिणाम म्हणजे इंग्रजी सत्तेचें दृढीकरण होय. हें इंग्रजी सत्तेचें दृढीकरण म्हणतांनाच एक गोष्ट ध्यानांत येतें कीं इंग्रजी सत्ता ही त्यापूर्वींच रुजली होती. त्या सत्तेच्या विजयानें स्तिमित झालेल्या दोन पिढ्या होऊन गेल्या होत्या. 'ईश्वरी वरदानाची' कल्पना इंग्रजी विजय समजावून देत होती. इ. स. १८५३ सालीं मुंबई–पुणें आगगाडीचा फाटा चालू झाल्याबरोबर नारळ फोडून 'चाक्या म्हसोबाचें' स्वागत करण्यांत किंवा "टोपीवाल्यानं केला कावा। आगिनगाडी येते धांवा" अशा कवनांत रस वाटूं लागला होता. रावबाजीची कारकीर्द संपली म्हणून समाधानाचे निःश्वास सुटत होते. अशा परिस्थितींत इंग्रजांच्या विजयानें त्यांच्या सामर्थ्यावरची, त्यांच्या राज्ययंत्रावरची श्रद्धा वाढीला लागली. १८५७ च्या पराजयाची खंत तत्कालीं वाटणारे कितीसे होते याचा उहापोह तर सहजीं नजरेसही येत नाहीं. वस्तुतः ती स्वधर्मासाठीं किंवा स्वराज्यासाठीं खटपट होती तर तिच्यांत सर्वांत जास्त वाटा, नामधारी नव्हे–तर खरीखुरी सत्ता गाजवणाऱ्या महाराष्ट्राचा असावयाला हवा होता. पण त्या उठावाचें केंद्र बनलें नामधारी बादशहाचें उत्तर हिंदुस्थान–याचें कारण एकच दिसतें कीं, इंग्रजांचा हिंदुस्थानावरचा विजय हा सैनिकी विजय नव्हता तो औद्योगिक संस्कृतीचा, यंत्रयुगाचा यंत्रहीन देशावरचा विजय होता. १८५७ सालीं इंग्रजाविरुद्ध लढायला इतके राजे, संस्थानिक उरले तेच मुळीं दळणवळणाच्या अभावीं मोगलीं आणि मराठी मध्यवर्ति सत्तांना न जुमानणारे सुभेदार स्वतंत्रपणें वावरूं लागले म्हणून–यासाठींच १८५७ च्या परिणामांचा विचार करतांना हें सांगावें लागतें कीं यदाकदाचित् एकाद्या युक्तीनें, किमयेनें, सत्तावनाचा उठाव सैनिकी चढाईत यशस्वी ठरला असता तरी तो विजय क्षणिकच राहिला असता. कारण

जोपर्यंत यंत्रयुगाला आत्मसात् करण्याची आवश्यकता पटली नव्हती, जाणीवसुद्धां निर्माण झाली नव्हती तोपर्यंत यंत्रांवताराचें वरदान असलेला कोणता ना कोणता युरोपीय देश आमच्या बोकांडी बसलाच असता. आजच्या राजकीय स्वराज्यांतही, यंत्रासाठीं, अर्थासाठीं अजून आम्हीं परतंत्र आहोंतच ना ? त्याची मोठी आवृत्ति फारतर त्या वेळीं दिसली असती–याचाच अर्थ असा कीं १८५७ च्या अन्वयार्थाचा प्रश्न केवळ कागदी पुराव्यापुरता मर्यादित नसून ‘ स्वराज्य ’ म्हणजे काय–या मूलभूत कल्पनेबाबतच्या भिन्न भिन्न मतप्रणालीशीं निगडित आहे. आणि या कल्पनांत जितके मतभेद तितकेच १८५७ च्याच काय कोणत्याही काळच्या घटनेचा अन्वयार्थ लावतांना ते आढळून येईल. म्हणूनच इ.स.१८५७च्या उठावाचा गौरव करून आपल्या काळांतील राजकीय हालचालींना त्याची पार्श्वभूमि, त्याचे पवाडे यांची जोड देण्याची स्वा. सावरकरांची कामगिरी खऱ्या अर्थानें महाकवीची आहे; तर यंत्रयुगाच्या परिणामांची आणि १८५७ नंतरच्या पहिल्या पन्नाशींतील घडामोडींची दखल घेणाऱ्या अभ्यासकाला तो एक साधा बंडाचा भाग वाटला व त्यानें स्पष्टपणें तसें म्हटलें तर ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीनें त्याच्यावर रागावून किंवा हिरमुष्टी होऊन भागणार नाहीं.

\+ \+ \+

इ. स. १८५७ च्या एकंदर हकीकतींत साधनांच्या दृष्टीनें जितका अपुरेपणा आढळतो तितका तो झांशीच्या हकीकतींत आढळत नाहीं. मागें म्हटल्याप्रमाणें या प्रकरणांत उपलब्ध असलेला एकुलता एक समकालीन मराठी ग्रंथ–गोडसे भटजींचा “ माझा प्रवास ” – याचा दुसरा मथळा ‘ सन १८५७ सालच्या बंडाची हकीकत ’ असा असला तरी त्यांतील मुख्य भर झाशी येथील आणि झाशीच्या राणी लक्ष्मीबाईच्या चरित्राशीं निगडित असलेल्या काल्पी-ग्वाल्हेर येथील हकीकतीवर आहे.

झाशींच्या राणी लक्ष्मीबाईंचीं दोन चरित्रें उपलब्ध आहेत. दोन्हीहि मुख्यतः इंग्रज इतिहासकारांनीं लिहिलेल्या हककतीवर आधारलेलीं असलीं तर त्यांतल्या जुनें असलेलें रा. ब. पारसनीस यांनीं लिहिलेलें चरित्र मूळ कागदोपत्रीं पुराव्यानें आणि त्याचप्रमाणें झांशींच्या वंशजांकडून मिळालेल्या माहितीचा योग्य उपयोग करून लिहिलेलें आहे. शिवाय ह्या चरित्रलेखकांचीं साधनें कितीहि पक्षपाती असलीं तरी त्यांनीं आपलीं चरित्रें लिहितांना चारित्रनायिकेला अन्याय होऊं नये ही भूमिका यथाशक्य घेतली आहे. लेखक महाराष्ट्रीय, त्यांची चरित्रनायिका महाराष्ट्रीयच आणि तीहि एक पराक्रमी स्त्री असल्यामुळें त्यांच्या भूमिकेंत सहाजिकच इंग्रजी इतिहासकारांच्या भूमिकेंतील विपर्यासाला वाव मुळींच नाहीं. रा. ब. पारसनीसासारख्या इतिहाससंशोधनाच्या क्षेत्रांत मुरलेल्या लेखकांकडून झाशींच्या चरित्रांत आलेली एकच गोष्ट कदाचित् खटकणारी वाटेल. ती म्हणजे इंग्रजी राजवटींत लिहिलेल्या या चरित्रांत झाशीची राणी बंडांत सामील होण्याचा काळ त्यांनीं जास्तींत जास्त पुढें ढकलण्याचा प्रयत्न केला आहे आणि तिची इंग्रजनिष्ठा ही जितकी सजवतां येईल तितकीं सजवून दाखवली आहे. सारांश झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंची जी हकीकत उपलब्ध आहे; ती पुष्कळ प्रमाणांत विश्वसनीय अशीच असल्याचें कबूल करावें लागेल. ही हकीकत थोडक्यांत अशी :

इ. स. १८१८ सालीं पेशवाईची अखेर होऊन दुसरा बाजीराव पेशवा ब्रह्मावर्तास गेला. त्यावेळीं त्याच्याबरोबर महाराष्ट्रांतून जीं कुटुंबें उत्तर हिंदुस्थानांत गेलीं, त्यापैकीं वाईच्या मोरोपंत तांब्यांचें एक कुटुंब होतें. याच मोरोपंत तांब्यांची मुलगी मनुताई ही पुढें इतिहासांत गाजलेली राणी लक्ष्मीबाई होय. मनुताईचा जन्म काशीस इ. स. १८३५सालीं झाला. लहानपण हें दुसऱ्या बाजीरावाचे चिरंजीव नानासाहेब यांच्याबरोबर गेलें. पेशव्यांच्या सहवासांत राहिले तरी तांबे हें पेशव्यांचे आश्रित—अर्थातच

नानासाहेबांना मिळणाऱ्या लष्करी शिक्षणाचा कांहीं भाग मनुताईच्या वाट्यास आला तरी त्यांचे वैभव वाट्यास येणें शक्य नव्हतें. पेशव्यांना हत्तीवर बसलेले पाहून मनुताईनाही हत्तीवर बसण्याची इच्छा झाली व ती त्यावेळीं पुरी झाली नाहीं. तेव्हां त्यांनीं "माझ्या नशिबांत दहा हत्ती आहेत" असें उद्गार काढल्याची एक दंतकथा आहे. वयाच्या आठव्या वर्षीं मनुताईचा विवाह झाशीच्या गंगाधररावाशीं होऊन त्यांना राणीची पदवी मिळाली व दहाच्या ऐवजीं वीस हत्तींचें वैभव मिळालें अशी उपरोक्त दंतकथेची पूर्तता करण्यांत येते.

ज्या झाशीचा राणीपणा लक्ष्मीबाईच्या वाट्याला आला तिचा इतिहासही मनोरंजक आहे. झाशी हा पेशव्यांचा सुभा. बुंदेलखंडांत पेशव्यांनीं आपला एक स्वतःचा सुभा ठेवला तो मुळांत शिंदे – होळकरांवर देखरेख ठेवण्यासाठीं आणि हे शिंदे–होळकरही पेशव्यांनीं निर्माण केलेले सुभेच. पण स्वपराक्रमानें ते पेशव्यांच्या बरोबरीचे झाले, स्वतंत्रपणें राजकारणें लढवूं लागले तेव्हां पेशव्यांना नवा सुभा निर्माण करावा लागला. ह्या बुंदेलखंडाच्या सुभ्यांत गोसाव्याची बंडाळी निर्माण झाली–तिचा मोड करण्यासाठीं पाठवलेला रघुनाथ हरि नेवाळकर हाच झाशीचा सुभा झाला. सदर नेवाळकर हा लक्ष्मीबाईच्या घराण्याचा मूळ पुरुष होय. रघुनाथरावाच्या मृत्यूनंतर झाशीची सुभेदारी शिवरामभाऊ या त्याच्या भावाकडे आली. शिवरामभाऊंनीं इंग्रजांशीं स्नेहाचे संबंध राखून ठेवले व बुंदेलखंडाचा कारभारही चोख ठेवला आणि आसपासच्या मुलखांत आपला वचक बसविला. शिवरामभाऊंच्या मृत्यूनंतर त्यांचा नातू रामचंद्रराव गादीवर आला. याच्याच कारकीर्दींत पेशवाईची अखेरी झाली; व पेशवे आणि इंग्रज यांच्या दरम्यान जो तह झाला त्या तहान्वयें पेशव्यांचे सारे सुभे, मांडलिक हे इंग्रजांचे सुभे, मांडलिक झाले. झाशीचें इंग्रजाशीं संधान चांगले असल्यामुळें

झाशीशीं झालेल्या तहांत ती गादी वंशपरंपरागत चालवण्याचें कलम घालण्यांत आलें. यांतूनच राणी लक्ष्मीबाईच्या दत्तकाचा वाद उद्भवला असें म्हणतां येईल. कारण इ. स. १८५३ सालीं लक्ष्मीबाईचे पति गंगाधरराव मृत्यु पावले, त्याच्या आधीं थोडा वेळ त्यांनीं आपल्या गोत्रापैकीं दामोदरपंत या मुलास इंग्रज अधिकारी मार्टिन आणि एलीस यांच्या समक्ष दरबारांत दत्तक घेतलें; व हा दत्तक गादीचा वारस म्हणून मान्य करण्यांत यावा अशी विनंती पुढें करण्यांत आली. डलहौसी व त्याचे मंत्री यांनीं दत्तक नामंजूर करून झाशीचें राज्य खालसा केलें. या संदर्भात राणी लक्ष्मीबाई आणि त्यांचा पक्ष यांच्या वतीनें पूर्वीच्या तहांतील झाशीची गादी वंशपरंपरागत चालवण्याचा अश्वासनाचा उल्लेख करण्यांत येत होता. तर डलहौसीच्या खालसा धोरणाचें समर्थन निराळ्याच मुद्यावर आधारलेलें होतें. डलहौसी पक्षाचा मुख्य मुद्दा हा होता कीं झाशीचें संस्थान हें स्वतंत्र राज्य कधींच नव्हतें. सुरवातीस झाशीकर हे पेशव्यांचे मांडलिक होते व पेशव्यांशीं इंग्रजांचा तह झाला त्या तहान्वयें ते इंग्रजांचे मांडलिक झाले होते. म्हणून स्वतंत्र संस्थानिकाशीं किंवा राजाशीं केलेल्या तहाची प्रतिष्ठा झाशीसारख्या मांडलिकाशीं केलेल्या तहाला कधींच प्राप्त होत नाहीं. या मुद्याच्या समर्थनासाठीं आणखी एक पुरावा देण्यांत आला तो असा कीं शिवरामभाऊंच्या नंतर झाशीच्या गादीवर आलेले त्यांचे नातू रामचंद्रराव हे जेष्ठ ( मयत ) मुलाचे चिरंजीव म्हणून वारसा हक्कानें आले होते तरी त्यानंतर झाशीची गादी हिंदु-वारसाहक्काच्या पद्धतीनें कधींच देण्यांत आली नव्हती. कारण रामचंद्र-रावाचें मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीनें एक दत्तक घेतला होता. पण तो नाशाबीत धरून रामचंद्ररावाचा चुलता रघुनाथराव याला झाशीशी गादी देण्यांत आली. रघुनाथराव मरण पावल्यावर पुनश्च वारसाचा प्रश्न आला तेव्हां रामचंद्ररावाचा पूर्वोक्त दत्तक पुत्र, रघुनाथरावाचे दोन दासीपुत्र आणि

बंधु गंगाधरराव इतके चार लोक झांशीवर हक्क सांगत होते. त्यांपैकीं गंगाधररावांना गादी मिळाली. तेव्हां गंगाधररावांच्या मृत्यूनंतर वारसाचा प्रश्न आल्यावर दत्तकपुत्र दामोदरपंत याचें दत्तकविधानानें निर्माण झालेलें नातें लक्षांत न घेतां वंशावळीच्या आधारें तो गंगाधररावांचा दूरचा भाऊ लागतो असें इंग्रजांनीं सुचविलें; व त्याशिवाय गादीवर वारसा सांगणारे इतर लोक होते, त्यांत जवळचे वारस होते इत्यादि कारणें देऊन झाशी खालसा करण्याचा मार्ग स्वीकारला. यांत एक गोष्ट निश्चित कीं झाशीचा वारसा हा हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें ठरविला जात नव्हता. इंग्रजांच्या सत्ताशास्त्राप्रमाणें ठरविला जात होता. नाहींतर मुळांत रामचंद्ररावाचा दत्तक मागें पडून त्याचे चुलते रघुनाथराव आणि गंगाधरराव हेच गादीवर येऊं शकले नसते. एकदां हें मान्य केलें म्हणजे मग इंग्रजी सत्ताशास्त्राला, विशेषतः डलहौसीच्या प्रवृत्तीच्या अधिकाऱ्याला झाशीसारखे मध्यवर्ती ठिकाण मध्यभारतांत ब्रिटिशसत्ता दृढमूल करण्यासाठीं आपल्या ताब्यांत असावेंसें वाटलें, त्यासाठीं आपोआप चालत आलेली संधि त्यानें साधली तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. तेव्हां इंग्रजी राजवटीच्या आणि राजनीतीच्या किंवा चतुराईच्या दृष्टीनें डलहौसीचा निर्णय हा क्रमप्राप्त होता असेंच म्हणावें लागेल. ह्या निर्णयापासूनच झाशीला १८५७ च्या उठावांतील स्थान म्हणून महत्त्व प्राप्त झालें.

झाशी खालसा करण्याचा डलहौसीचा निर्णय त्याच्या एकंदर धोरणाला धरून असला तरी तो तसा इतरांना–विशेषतः झाशीच्या राजघराण्याला–वाटणें शक्य नव्हतें. 'के'च्या म्हणण्याप्रमाणें झाशी खालसा करण्यामुळें राणी लक्ष्मीबाई या दुखावल्या गेल्या व तो त्यांना अपमान वाटला. त्यामुळें त्या इंग्रजांचा अतिशय द्वेष करूं लागल्या. त्याच वेळीं इंग्रजांनीं केलेल्या गोवधानें राणीच्या रागांत भर पडली व लोकही चिडले. या गोवधाच्या

प्रकरणीं खुद्द लक्ष्मीबाईनीं व झाशीच्या लोकांनींही ब्रिटिश सरकारकडे अर्ज पाठवले. उण्याला भर म्हणूनच कीं काय झाशीच्या राणींना म्हणून जी रक्कम पेन्शनादाखल मिळत होती त्यांतूनच लक्ष्मीबाईंचे पति गंगाधरराव यांच्या कर्जाचे हप्ते कापण्यास सुरवात झाली. सरकारच्या या कृत्याला के सुद्धां ‘ कमालीच्या कंजूषपणाचा अपराध ’ ( guilty of the extra-ordinary meanness ) म्हणतो.

प्रत्यक्षतः १८५७ चा उठाव सुरू झाला त्या वेळीं झाशीवर इंग्रजांची सत्ता होती. राणी लक्ष्मीबाईचा दत्तक नामंजूर झालेला होता. इंग्रज इतर ठिकाणाच्या बंदोबस्तांत गुंतलेले होते. ह्या परिस्थितीचा फायदा घेण्यास दोन लोक उपटले. एक झाशीच्या गादीवर वारसा सांगणारा सदाशिव नारायण आणि दुसरा बुंदेलखंडांतील एक लहानसा संस्थानिक नथेखां. त्यांपैकीं सदाशिव नारायणाचा जम बसलाच नाहीं. नथेखांनें राणींना इंग्रज देत होते तेंच पेन्शन देण्याचें आमिष दाखवलें. पण झाशीवर इंग्रजांची सत्ता नाममात्र उरली. त्यावेळीं राणी लक्ष्मीबाईंनीं सैन्याची जमवाजमव करून नथेखांशीं मुकाबला केला व त्यांत विजय मिळवला. येथूनच त्यांच्या पराक्रमी जीवनाला खरी सुरवात झाली. या लढाईचा इंग्रजांकडे वृत्तांत गेला तो मात्र परस्पर-विरोधी. नथेखांच्या पक्षाच्या लोकांनीं असें भासवण्याचा प्रयत्न केला कीं झाशीची राणी बंडवाल्यांच्या बाजूची; आपण इंग्रजांच्या वतीनें या बंडवाल्याचा मोड करण्यासाठीं झाशीशीं लढलों; उलट झाशीच्या राणींच्या वतीनें असें सांगण्यांत येतें-निदान ब्रिटिश राजवटींत निर्माण झालेल्या झाशीच्या चरित्रांत असें समर्थन आढळतें-कीं इंग्रजांना स्वतःला झाशीचें रक्षण करतां येण्यासारखी स्थिति उरली नव्हती, तेव्हां इंग्रजांसाठीं व त्यांच्या वतीनेंच राणी लक्ष्मीबाईंनीं नथेखांशीं लढा दिला. नथेखांच्या लढाईत खरोखरी एक तरी पक्ष इंग्रजांच्या बाजूचा

होता काय याचा निर्णय करणें अवघड आहे. मात्र झाशीच्या लक्ष्मीबाईंना या प्रसंगीं राजनिष्ठ ठरवणाऱ्यांची मजल याच्याही फार पुढें गेली आहे. सर ह्यू रोजचें सैन्य झाशीवर चाल करून आलें त्या वेळीं झाशीच्या राणींनीं वकील पाठवून आपली बाजू इंग्रजांना समजावून देण्याचा प्रयत्न केला—त्याच्या आधींचे प्रयत्न अननुभवी कारभाऱ्यांनीं मधेंच दडपून टाकले होते—पण त्या वकीलांचा निराळाच सत्कार झाल्यामुळें लढाईवांचून गत्यंतर उरलें नाहीं. इतकेंच काय पण पूर्वोक्त नथेखांचे लोक रंग फासून इंग्रजांच्या मिषानें झाशीवर हल्ला करण्यास आले. त्यामुळें झाशीच्या राणींनीं लढाई केली असें म्हणण्यापर्यंत कांहींची मजल गेली आहे. "कोणी म्हणतात, इंग्रजांचें सैन्य झांशीजवळ आल्याची खबर जेव्हां झांशीमध्यें आली, तेव्हां लोकांचा असा तर्क झाला कीं, हें नथेखांचें सैन्य असून तो आपल्या सैन्याच्या तोंडास रंग देऊन व त्यांना निराळे पोषाख देऊन पुनः झाशी घेण्याकरितां आला आहे. या समजुतीनें झाशी दरबारांतून त्याजबरोबर युद्ध करण्याचा हुकूम सुटला." (पारसनीसकृत चरित्र पृ. १०७)

सर ह्यू रोजच्या प्रकरणानंतरचें राणीचें चरित्र वादातीत आहे. या पुढच्या त्यांच्या हालचाली या १८५७ च्या मुख्य उठावाच्या दिशेनें झाल्या याबद्दल संशय नाहीं. राणी लक्ष्मीबाईच्या चरित्रकारांपैकीं ज्यांनीं संपूर्ण चरित्र दिलें आहे त्यांच्या लेखनांत नथेखांची लढाई व ह्यू रोजची लढाई यांत राणींची नेमकी भूमिका काय होती याचा उलगडा ब्रिटिश राजवटींत कसा करण्यांत आला याचा नमुना वर दिला आहे. राणींच्या बालपणींच्या हकीकतींत जी वैभवाची, स्वाभिमानाची उर्मि होती ती श्रीमंत पेशवे आणि त्यांचे दरिद्री आश्रित तांबे यांच्यामध्यें दिसणाऱ्या भेदांतून निर्माण झाली होती असें म्हणतां येईल. नाहींतरी सात–आठ वर्षांच्या छबेलीच्या मनांत डोळ्यांपुढें दिसणाऱ्या फरकांहून अधिक

राष्ट्रविषयक किंवा तत्सम कल्पना होत्या असे म्हणण्यास सबळ पुरावा कोठून मिळणार ? पण झाशीचें राणीपद मिळाल्यावर, इंग्रज अधिकाऱ्यांनीं 'झाशी खालसा केली,' म्हणतांच उसळून 'मेरी झाशी नहीं दूंगी ! ' हे उद्गार काढणाऱ्या राणी नंतर इंग्रजनिष्ठेची किती प्रदर्शन करतील हा मुख्य प्रश्न आहे. 'के'सारखे इंग्रज इतिहासकार साहाजिकपणेंच पुढच्या घटनांच्या अनुरोधानें, आधारानें, असें स्वच्छपणें म्हणतात, कीं झाशींतल्या चट साऱ्या युरोपियनांना राणींनीं बंडवाल्यांच्या हातीं दिलें आणि त्यांनीं त्यांची कत्तल केली आणि इंग्रज झाशींत उरला नाहीं अशी स्थिति प्राप्त होतांच, आपलें सैन्य ठेवून, बंदोबस्त वाढवून, आपलें आसन स्थिर केलें.' मात्र याच वेळीं केनें हेंहि कबूल केलें आहे कीं राणीनें झाशीचा बंदोबस्त आपण इंग्रजासाठीं करीत आहोंत असें भासविलें. केच्या किंवा इतर इंग्रज इतिहासकारांच्या मतें झाशीच्या राणींचें वर्तन दुटप्पी होतें. हा आरोप अर्थातच आपण मान्य करूं शकणार नाहीं. पण मग प्रश्न उरतो तो हा कीं, झाशीच्या राणींनीं आपली दिशा नक्की केव्हां ठरविली ? 'मेरी झाशी नहीं दूंगी ' हे राणींचे उद्गार भावनेच्या उद्रेकाचे होते असेंच म्हणावें लागेल. कारण त्यानंतर त्यांनीं इंग्रज सरकारकडे केलेल्या निवेद-नांतले उतारेच देण्यांत आले आहेत. म्हणजे अर्ज–विनंत्यांची खटपट चालू होती तोंपर्यंत तरी झाशीच्या राणींची दिशा आणि कार्याची व्याप्ति आपली गादी किंवा संस्थान टिकाविण्यापुरतीच मर्यादित होती यांत शंका नाहीं. सर ह्यू रोजशीं झाशीच्या राणींनीं जी लढाई केली ती ते नथेखांचे रंग फासलेले लोक होते या गैरसमजानें केली किंवा आपण पाठवलेले वकील पकडले गेले म्हणून केली हाही एक तर्कच राहतो. त्यांतला पहिला तर्क तर हास्यास्पद म्हणावा लागेल. सर ह्यू रोजशीं लढाई देतांना राणी लक्ष्मीबाई या उघडपणें १८५७ उठावांत

सामील झालेल्या होत्या हें म्हणणें जास्त सयुक्तिक आणि सुसंगत ठरेल. त्यापूर्वींचा नथेखांचा उठाव ही एकंदर गडबड कोणत्या कोटीला पोंचली आहे याची वानगी असून त्या वेळची भूमिका अस्पष्ट असावी. धामधुमीच्या काळांत आलेल्या संधीचा उपयोग करून घेण्याची मुत्सद्देगिरी त्यांत होती हेंच अधिक शक्य दिसतें.

एकंदरींत, ढोबळ मानानें, राणी लक्ष्मीबाईच्या जीवनांतील पराक्रमी आणि उज्ज्वल कालखंडाची प्रस्तावना नथेखांच्या चढाईनें केली आणि त्यानंतर सर ह्यू रोजशीं झालेली लढाई, काल्पीचा संग्राम आणि अखेरींची ग्वालेरींची लढाई यांत त्यांच्या पराक्रमीपणाची, चतुरतेची चढती कमान दिसून आली असें म्हणतां येईल.

× × ×

इंग्रजांचे पक्षपाती इतिहास आणि पुढील कालांतील राजकीय उठावाचें साधन या दोन्ही भूमिका बाजूला ठेवून इ. स. १८५७ चा एकंदर उठाव किंवा एकट्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाईचें चरित्र यांकडे शक्य तितक्या ऐतिहासिक दृष्टीनें पहाण्याचा प्रयत्न करतांना, सध्यांच्या उपलब्ध माहितींत कांहीं खटकणारे भाग आढळतात यांत संशय नाहीं. नवीन माहिती उजेडांत आल्यास कदाचित् त्यावर कांहीं प्रकाश पडूं शकेल. सध्यांच्या स्थितींत ऐतिहासिक निवेदनाची भूमिका घेणाऱ्याला झाशीच्या राणींच्या चरित्रांतील अर्जविनंत्याच्या कालखंडाचा उल्लेख करतांना कांहीं अप्रिय गोष्टी सांगव्या लागतील. याच अर्थानें इतिहासाकाराचें काम कटु असतें. इतिहास हाही भाष्यात्मक असतो आणि कविता हीही भाष्यात्मक असते असें म्हणतांना शब्दप्रयोग तेच–ते येत असले तरी त्यांच्या व्याप्तींत फरक पडतो तो अशा प्रसंगीं. भाष्यात्मक इतिहास लिहिणारालासुद्धां ज्ञात घटना–प्रसंग लपवतां येत नाहींत, ते सर्वच्या सर्व सांगून त्यांची

संगति लावून दाखवावी लागते. तसा प्रयत्न इंग्रजी राजवटीच्या वातावरणांत–त्या परिस्थितींत अपरिहार्य असें आज म्हणतां येईल अशा रीतीनें रा. ब. पारसनीसांनीं झाशीच्या राणीच्या चारित्रांत केला. उलट कवीला भाष्य करतांना सारेच प्रसंग काव्यांत गोवले पाहिजेत असें बंधन नसतें. काव्याला आणि विशिष्ट प्रतिपादनाला अनुकूल असतील तेवढेच प्रसंग निवडून आपलें भाष्य करतांना आपलें भाष्य रचतां येतें. त्यामुळें इतिहासांतील खटकणारे प्रसंग वगळून, उर्जस्वल प्रसंगांचें स्तोत्र गाणें हें कवीला शक्य होतें. प्रस्तुत संग्रहाचे लेखक तिवारी यांनीं झाशीच्या संग्रामदेवतेवर सलग काव्यरचना न करतां, वेगवेगळे अकरा प्रसंग निवडले याचें एक रहस्य या परिस्थितींत आणि ती परिस्थिति अचूक हेरण्यांत आहे असें म्हणावें लागेल. मात्र तिवारींच्या काव्यरचनेची एकंदर व्याप्ति पहाणाऱ्याच्या हें ध्यानांत येईल कीं, तिवारींनीं सामान्यतःच प्रदीर्घ रचनेपेक्षां फुटकळ प्रसंग रचनेची पद्धति पत्करली होती. तेव्हां तिवारींची एकंदर रचना–प्रवृत्ति आणि झाशीचा इतिहास या दोन्हींचा परिपाक या स्फुट–रचनेच्या रूपानें आविष्कृत झाला हेंच अधिक खरें असण्याचा संभव.

तिवारींची सामान्य रचना–प्रवृत्ति फुटकळ प्रसंगरचनेची होती असें वर म्हटलें. ही प्रवृत्ति अर्थातच भावगीत रचनेची नव्हे. विषयदृष्ट्या तिवारींच्या रचनेकडे पहाणाऱ्याला ती ऐतिहासिक विषयांची आहे असें चटकन् म्हणतां येईल. पण विषय ऐतिहासिक असला म्हणजे रचना ऐतिहासिक होतेच असा दंडक नाहीं. किंबहुना मराठींत आधुनिक काळांत ऐतिहासिक विषयांच्या आधारानें जी रचना झाली आहे तिच्यांतील पुष्कळशी रचना वाङ्मयदृष्ट्या ऐतिहासिक म्हणतां येणार नाहीं अशा प्रकारची आहे. स्कॉटच्या धर्तीवर ऐतिहासिक कालांत प्रणयकथा संक्रांत करणारे नाथमाधव, इतिहासाचा किंवा पुराणाचा नाममात्र उल्लेख करून

राजकीय भाष्य करणारे परांजपे किंवा खाडिलकर हीं अन्य हेतूनें ऐतिहासिकाला साधन म्हणून राबविणाऱ्या गद्यलेखकांचीं उदाहरणें म्हणतां येतील. पद्यांमध्यें इतिहास विषयाचा शिरकाव प्रमुखपणें झाला तो कवि विनायकांपासून. विनायकांच्या संग्रहाकडे नजर टाकणाऱ्यास त्यांत ऐतिहासिक विषयावरील कथानकांच्या जवळपासच मेळ्यांतील पदांचीहि भेट होते. म्हणजे लो. टिळकांनीं शिवाजी–उत्सव आणि गणेशोत्सव ज्या हेतूनें, ज्या काळांत सुरू केले, त्याच हेतूनें, त्याच काळांत एका विशिष्ट तऱ्हेची रचना काव्यांत रूढ झाली. उघडपणें राजकारण आणि इतिहास यांची संगत जोडली जाऊं लागली. कवि विनायकांच्या प्रसिद्ध द्विपदीनें या संगतीची व्याख्या ठरवून टाकली:—

" पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाळ
बोध हाच इतिहासाचा सदा सर्व काळ "

याच भाविकाळाविषयीं परोक्षपणानें बोलण्यासाठीं, प्रखर वर्तमानकाळाविषयीं स्पष्ट बोलण्याचें धाडस होत नव्हतें तेव्हां भूतकाळाचे पवाडे गाणें ही एक गोड वाटणारी, आडवळणानें का होईना ' राष्ट्रकार्य ' केल्याचें समाधान देणारी वृत्ति होती. या वृत्तीनें निर्माण झालेली कविता थोडीशी इतिहासाची कदर करणारी आहे, थोडीशी वर्तमान वृत्तींना छुपेपणानें आसरा देणारी आहे. म्हणूनच तिच्यांत कलादृष्ट्या संमिश्रता आहे.

वर ' भूतकाळाचे पवाडे गाणें ' हा जो शब्दप्रयोग केला त्यांतच या संमिश्रतेचें बीज आहे. खरोखरी ' पवाडा ' हा अगदीं उनउनीत ताजातवाना वाङ्मयप्रकार. घटना घडलेली शाहीरानं डोळ्यांनीं पहावी किंवा फार तर जासूदाच्या थैलींतली हकीकत ऐकावी आणि चसल्या बैठकींत डफावर थाप मारून बहार उडवावी, घटनेच्या बऱ्या-वाईट स्वरूपानुसार उमेदीला उधाण आणावें किंवा आसवांना वाट करून

द्यावी—ही शाहीराची खरी करामत. प्रसंगाच्या ताजेपणाला शाहीराच्या शीघ्र रचना-कौशल्यानं चपळाईनं कव घातली तरच ती खरी शाहीरगिरी. पण शाहीरगिरीचा हा दिमाख, हा जिवंतपणा मराठेशाहीबरोबरच संपला. ज्यांच्या पराक्रमांचे पवाडे गावेत असे वीर उरले नाहींत, प्रसंग उद्भवले नाहींत. जमाना बदलला. बदललेला जमाना आपल्या हयातींत प्रभाकर शाहिरानें पाहिला. शाहिरी वाङ्मयाची अखेरी तिथेंच झाली. पण मंत्र नसला तरी तंत्र भुलवूं शकतें—तंत्राच्या मोहिनीनें झुलता आणि झुलवतां येतें त्याचंच एक उदाहरण म्हणजे शाहिरी वळणाची रचना. तिला पोवाड्यांना हवें तें जिवंत वातावरण मिळेनासें झाल्यावर तिनें भूतकालाच्या पवाड्यांचा वदतोव्याघात निर्माण केला. म्हणण्याचा सारा साज उभविणारे निघाले आणि पवाड्यांचा जीर्णोद्धार झाला !

आशयानें विनायकांच्या कालांतील संमिश्रता आणि रचनेच्या ढंगांत ‘ पवाड्यांचा जीर्णोद्धार ’ एवढी सामग्री पुरेशी लोकप्रियता मिळवण्याला उपयुक्त ठरणारें भांडवल ठरलें तें राष्ट्रीय चळवळीच्या काळांत. पारतंत्र्यांत स्वराज्याभिमुख करणारें कोणतेंही साधन, कोणतीही कृति ही उपयुक्ततेच्या कसोटीवर स्वीकार्य, प्रशंसनीय ठरते; कांहीं एका मर्यादेपर्यंत ती तशी असतेही. तिवारींच्या संग्रामगीतांच्या आठ आवृत्त्या निघाल्या. झाशीच्या संग्रामदेवतेची ही पांचवी आवृत्ति निघूं शकत आहे. या त्यांच्या लोकप्रियतेंत उपरोक्त परिस्थितीचा फार मोठा वाटा आहे हें नाकारतां येणार नाहीं. कारण त्यांनीं पवाड्यांचा ढंग पत्करला आहे, पारतंत्र्याच्या काळांत राजकीयदृष्ट्या अनुकूल वाटतील अशा उल्लेखांची पेरणी केली आहे आणि एकंदरींत चिपळूणकर-विनायकांच्या लोकप्रिय वाटेनें आपल्या काव्यजीवनाचा मार्ग क्रमिला आहे. म्हणूनच केशवसुतांनंतरच्या आधुनिक काव्याच्या एकंदर ओघांतील काव्यदृष्ट्या प्रभावी,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
★ प्रस्तावना ★ ... विः ...
क्रमांक ... नोंदः दिः ...

प्रातिनिधिक वळणें वेगळीं असून सुद्धां त्या वळणांच्या रचनाकारांच्या वाट्यालाहि क्वचित् येणारी लोकप्रियता—काव्याच्या खपाच्या दृष्टीनें—तिवारींना लाभली असें दिसतें.

ही लोकप्रियता मिळवून देण्याजोगी तिवारींची साधना कोणती? कोणी असें म्हणेल कीं राष्ट्रव्यापी चळवळी, राजकीय जागृति, सामूहिक भावना यांच्याकडे कवित्वशक्तीसाठीं नांवाजलेल्या कवींनीं पाठ फिरविली तेव्हां तिवारी त्यांना सामोरे गेले हीच बाब पुरेशी महत्त्वाची आहे. राष्ट्रीय भावनेचे गोडवे गाऊन केशवसुतांवर स्त्रैणपणाचा आरोप एकदां करण्यांत आला होता. पण ही एवढीच बाब पुरेशी आहे असें वाटत नाहीं. कारण खरोखरी राष्ट्रीय भावनेंत तिवारींपेक्षां अनंतपटींनीं प्रभावी ठरलेल्या टिळकांच्या लेखांनाही ग्रंथरूपांत ही लोकप्रियता खपाच्या हिशेबीं तरी मिळालेली नाहीं. तेव्हां या स्थूल राष्ट्रीय भावनेच्या स्वीकाराशिवाय आणखी कांहीं गोष्टी विचारांत घेतल्याच पाहिजेत. तिवारींच्या रचनेला लोकप्रिय करणारा आणखी एक घटक म्हणजे पद्यरूपामुळें तिला अनेक प्रचारक मिळाले हा होय. खुद्द तिवारींनीं चौथ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत "झाशीच्या संग्रामदेवतेचीं संग्रामगीतें हरदास, कीर्तनकार गोरक्षणाचे प्रचारक यांनीं बृहन्महाराष्ट्रांतील कानाकोपऱ्यापर्यंत नेऊन भिडविलीं" असल्याचा उल्लेख केला आहे. शिरगुप्पीकरांच्या बालनटांच्या नाटकमंडळीचा "झाशीची राणी" हा हातखंडा खेळ. त्या खेळांत नाटकाबरोबर कांहीं दृश्यांचे फिल्मवरील तुकडे दाखवण्यांत येतात त्या वेळीं या चित्रांबरोबर संग्रामगीतांतील कांहीं भाग म्हटला जातो. ही नाटकमंडळी मोठ्या शहरांतून फारशी हिंडत नसली तरी खेडोपाडीं किंवा लहानसर शहरांतून तिचे प्रयोग होतात. त्यांची लोकप्रियता ठाऊक असलेल्यांना, तिवारींच्या रचनेचा आपोआप प्रचार आणि प्रसार कसा होतो याची कल्पना येईल.

अर्थात् असा प्रसार करावासा वाटणें हीसुद्धां सोपी बाब नाहीं. तिवारींच्या रचनेंत मुळांतच असे कांहीं विशेष आहेत कीं, त्यामुळें हा प्रसार शक्य होतो. उदाहणादाखल पुढील एक पंक्ति देतां येईल—"मर्दांना मर्दुनि गेली मर्दानी झाशीवाली"—या पंक्तींत तिवारींच्या रचनेच्या लोकप्रिय ठरणाऱ्या आणि काव्याभ्यासांत दोषपूर्ण वाटणाऱ्या अशा बहुतेक लकबा आल्या आहेत. 'म'काराचा अनुप्रास आणि त्याबरोबरच मकारयुक्त शब्दांच्या अर्थांतून येणारी चमत्कृति ही सामान्य श्रोत्यांना आकर्षून घेण्याला पुरेशी ठरते तर एकाच 'मर्द' शब्दाची विविध स्वरूपांतील पुनरुक्ति अभ्यासकाला खटकणारी वाटते. तिवारींच्या रचनेंत येणाऱ्या यमकानुप्रासांची पुष्कळदां अशीच अवस्था होते. यमकें साधलींत, अनुप्रास आढळतात, एवढा मसाला पवाड्याच्या ढंगांतील रचनेला—ती ऐकण्यासाठीं गर्दी करणाऱ्या श्रोत्यांच्या समुदायाला पुरेसा असतो; तर एकातांत काव्य म्हणून वाचायला निघालेल्या वाचकाला नेहमीं हीच पद्धति बहुशः त्रासदायक वाटते.

पाहिजे समयसूचकता
पाहिजे दूरदर्शकता
त्याविना ध्येय—निष्फलता.

—यासारख्या अंतऱ्यांत पहिल्या दोन ओळींत झालेली 'पाहिजे' या शब्दाची पुनरुक्ति किंवा अंतीं यमकासाठीं तिन्ही ओळींत योजलेली ता—प्रत्ययान्त भाववाचकांची युक्ति ही या प्रकारचें आणखी एक उदाहरण म्हणून देतां येईल. यांतील शिथिलता, किंबहुना सदोषता स्पष्ट आहे—पण ती काव्यवाचकाला, श्रोत्याला नव्हे. म्हणजेच निराळ्या शब्दांत असें म्हणतां येईल, कीं तिवारींनीं पद्याचा आश्रय केला असला तरी रचना, त्याच्या मागचें मानसशास्त्र हें गर्दीचें मानसशास्त्र आहे. मोठ्या जमावानें

पटांगणांत बसलेल्या श्रोत्यांना इतपत स्थूलता ही पुरेशी होते; याहून सूक्ष्म काव्यमयता ही बहुधा पेलतच नाहीं.

अर्थात्च तिवारींच्या रचनेंत आढळणारी ही स्थूल आकर्षकता हा त्यांच्या रचनेचा एक भाग होय. ह्या भागाचें स्वरूप वर सांगितल्याप्रमाणें असलें तरी त्याच्यांतच तिवारींची सारी लोकप्रियता सामावली आहे असें म्हणतां येणार नाहीं. तिवारींच्या या झांशीच्या पवाड्यांचें याहून मोठें आकर्षण आहे तें मूळ प्रसंगांत. त्यांतल्या एकाचें वर्णन विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं जातां जातां असें केलें आहे : " झांशी संस्थान तें काय, आणि त्याची माजी मालकीण एक रांडावलेली बाई काय, आणि तिनें सर ह्यू रोज याच्याबरोबर सामना काय दिला ! " सामान्यतः हेच उद्गार प्रस्तुत संग्रहांत काव्यविषय झालेल्या बहुतेक सर्व प्रसंगांबाबत सहजीं काढले जातील. १८५७ च्या पहिल्या फेरींत इंग्रजी सत्ता नामशेष झाली आहे, स्वतः पेन्शनर विधवा लक्ष्मीबाई झाशींतल्या वाड्यांत स्वस्थ बसली आहे, नथेखां चढाई करून येत आहे, त्याला प्रतिकार करायचा कुणी–तो बहुशः होणारच नाहीं असं वाटण्यासारखी अवस्था–त्यावेळीं लक्ष्मीबाईचा पराक्रम जाग्रत झाला, आविष्कृत झाला आणि विजयी ठरला–तीच स्थिति ह्यू रोजबरोबरच्या लढायांची, शिंद्याना पळवून लावण्याच्या हकीकतीची, किंवा काल्पी, ग्वाल्हेरीच्या संग्रामांची. म्हणजेच तिवारींनीं निवडलेल्या प्रसंगांचा कसच इतका मोठा होता कीं त्या कसाचे प्रसंग लेखणींतून कसेही उतरले तरी त्याचं वैभव कमी होऊं नये–किंबहुना ते लेखणींतून कसेही उतरणें हें शक्य नव्हतेंच. अर्थातच अशा प्रसंगांना हेरण्यांत, त्यांच्याशीं काव्यदृष्ट्या खेळण्यांतच एक निकोप सामर्थ्य आहे. तें सामर्थ्य तिवारींच्या प्रवृत्ति-परंपरेंत मुळांत होतें. पण तेवढेंही पुरेसें पडणार नव्हतें. कारण प्रस्तुत अकरा गीतांपैकीं " माझी आवडती झाशी " हा प्रसंग-

परिवर्तनाच्या धोरणानें दुसऱ्या क्रमाला आलेला प्रसंग, आणि "झाशीची बीजन झाली" हा सहावा प्रसंग हे दोन वगळले तर बाकीचे प्रसंग बहुतांशीं लढाईच्या वर्णनाचे आहेत. म्हणजे त्यांची मूस एका अर्थानें समान पद्धतीची आहे. वृत्तयोजना तर तिवारींनीं सरसहा एकच केली आहे. तेव्हां एकाच वृत्तांत, एकाच तऱ्हेच्या प्रसंगांचें वर्णन करतांना–तेही लढाई ही डोळ्यानें न पाहिलेल्या किंवा 'स्वकालांत' सञ्जय–वृत्तांताच्या रूपानेंही उपलब्ध नसलेल्या अवस्थेंत करायचें म्हणजे साहजिकपणेंच त्या वर्णनांत अपरिहार्य अशी पुनरुक्ति आणि कंटाळवाणेपणा येण्याचा संभव असतो.

आगींत निभाव न लागे । करपले मनाचे धागे
शहराला जागोजागीं । लागल्या भयंकर आगी

यासारख्या ओळींतून क्वचित् ती पुनरुक्ति डोकावत असल्याच्या कांहीं खुणा आढळतात. तरी पण सामान्यतः लढाईच्या वर्णनाचा स्थूल आराखडा वगळतां किंवा बदलतां येण्यासारखा नसूनहि, तिवारींनीं आपल्या रचनेंत पुनरुक्तीला फारसें वावरूं दिलें नाहीं हा त्यांचा एक विशेष म्हणावा लागेल.

संख्येच्या दृष्टीनें थोड्या वेळां, पण ठसठशीतपणें डोळ्यांत भरतील अशा कांहीं कल्पना, वर्णणांच्या लकबा या संग्रहांत मधून मधून डोकावतात आणि त्या वेळीं नुसत्या पवाड्याच्या ढंगाचा स्वीकार करणाऱ्या तिवारी-पेक्षां वेगळे तिवारी दिसूं लागतात–

की भूकंपाची लहरी
अचलांसहि कापविणारी
सर्वत्र फिरे अनिवारी
संवेगिनि तैशी गमली मर्दानी झाशीवाली

—अशा ओळींत किंवा 'घनगर्ज' तोफेची गर्जना ही 'भूधर शेषाचें

शीर्ष भीतीनें कापविणारी' कशी होती याचें वर्णन करतांना किंवा तटावरून घोडा फेकला तेव्हां झाशीची राणी ही प्रत्यक्ष—

नभ विदारुनि तेजस्वी          ही वीज उडाली काय
भीमाच्या हातामधली          कोसळे गदा कीं काय
निखळून स्वर्गद्वाराची          अर्गलाच पडली काय

असें वर्णन करतांना तिवारी हे पवाड्याच्या कारागिरींत गुंतून न पडतां कल्पनेच्या काव्यमयतेंत सहजीं झेप घालीत असल्याचें दिसतें. अर्थात् या कल्पनाहि जुन्या इतिहास-पुराणांतल्याच आहेत, संस्कृत वाङ्मयांत चावून चिवट झालेल्या आहेत असें कोणी म्हणूं शकेल, पण त्यांना पवाड्याच्या लोकाभिमुख चालींत आणतांना साहजिकपणेंच विषयाचें जें काव्यमय उदात्तीकरण होतें आणि मूळच्या संस्कृत कल्पनांना जी लोकाप्रियतेची विस्तृत बैठक लाभते, त्यांकडे डोळेझांक करतां येणार नाहीं.

एकंदरींत तिवारींच्या रचनेंत जे गुण–दोष आहेत ते इतके स्पष्ट आणि सहज उठून दिसणारे आहेत कीं त्यावर स्वतंत्र भाष्य करण्याची बहुतांशीं आवश्यकता पडत नाहीं. तिवारींना ही झाशीवरील गीत-मालिका रचतांना कोणती सामग्री उपलब्ध होती याची कल्पना त्यांनीं स्वतःच या संग्रहास जोडलेल्या झाशीच्या राणींच्या चरित्रावरून सहजीं येईल. त्या चरित्रांतील कांहीं तपशील, कांहीं विधानें, त्याचप्रमाणें प्रत्येक गीताच्या आरंभीं असलेला गद्य–भाग पहाणाऱ्याला हें चटकन् कळतें कीं तिवारींची रचना माहितीच्याच नव्हे तर भूमिकेच्या दृष्टीनेंसुद्धां बहुतांशीं रा. ब. पारसनीसांनीं लिहिलेल्या झाशीच्या राणींच्या चरित्रावर आधारलेली आहे.

तिवारींनीं ज्या काळांत ही रचना केली त्या वेळीं या विषयावर सहजीं उपलब्ध असलेला एकुलता एक मराठी ग्रंथ हाच होता. त्याची

तिवारींवर पडलेली छाप पाहिली म्हणजे साहजिकपणें कवि विनायकांच्या एका सुप्रसिद्ध पत्राची आठवण होते–विनायकांनीं आपल्या मित्राला लिहिलें होतें कीं, काव्यरूपानें गुंफतां येईल अशीं चरित्रें पाठवून द्या. तीच बैठक तिवारींनीं उचललेली आहे. विनायक आणि तिवारी यांच्यांत मूळ प्रतिभेच्या शक्तीचा असलेला फरक लक्षांत घेतां जिथें विनायकांनीं अशी विनंती केली, तिथें तिवारींनीं तेंच केलें याचें आश्चर्य वाटूं नये. कारण केव्हांही आपली मर्यादा ओळखून त्या मर्यादेंत वावरणारा मनुष्य हा कितीही लहान असला तरी त्याला झालेली जाणीव ही मोठी असते आणि तीच महत्त्वाची असते.

*ल. म. भिंगारे.*

—※—

डा. धं.

# महाराणी लक्ष्मीबाईचें संक्षिप्त चरित्र

सातारा जिल्ह्यांत वाई क्षेत्रांत राहणारे कृष्णराव तांबे हे कऱ्हाडे ब्राह्मण असून त्यांत पेशवाईंत मामलतीचा अधिकार होता. त्यांचे पुत्र बळवंतराव हे रावबाजींच्या वेळीं शूर सरदार म्हणून गणिले जात. बळवंतरावास मोरोपंत व सदाशिवराव असे दोन पुत्र होते. त्यांतून सदाशिवराव पूर्वींच वारले. **मोरोपंतांच्या** पत्नी **भागीरथीबाई** म्हणून होत्या. **या दंपत्याच्या** पोटीं समरधुरंधर अशा **महाराणी लक्ष्मीबाई** यांचा जन्म ता. १९।११। १८३५ रोजीं काशींत झाला. त्यांच्या जन्मानंतर ३।४ वर्षांनींच त्यांच्या मातोश्री परलोकवासी झाल्या. तेव्हां मोरोपंत रावबाजीबरोबर ब्रह्मावर्ती जाऊन राहिले होते. रावबाजीचे चिरंजीव **नानासाहेब** तसेच **रावसाहेब हे राणीसाहेबांचे लहानपणचे खेळगडी होत.** घोड्यावर बसणें, तरवार फेकणें, दौड मारणें वगैरे मर्दानी शिक्षण त्यांस लहानपणींच अनायासें मिळालें. त्यांचें **माहेरचें नांव मनुताई** असें होतें. परंतु त्यांचें सौंदर्य व नैसर्गिक स्वातंत्र्यप्रीति यामुळें त्या सर्वांस फार आवडत असत. म्हणून त्यांचे प्रेमीजन त्यांस लहानपणीं कधीं कधीं '**छबेली**' म्हणून संबोधीत.

एकदां दसऱ्याच्या स्वारीच्या वेळीं नानासाहेब रावसाहेब हे आपले सवंगडी अंबारीच्या हत्तीवर बसून निघालेले पाहतांच या छबेलीनें आपणासही हत्तीवर बसविण्याचा आग्रह धरिला ! मोरोपंतांनीं तिची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तिची समजूत कांहीं केल्या होईना. शेवटीं ते त्रासून म्हणाले, '**अग तुझ्या नशिबीं हत्ती कोठून येणार ?**' त्यावर त्या सुभगेनें तात्काल उत्तर दिलें, '**कां बरें ? एक सोडून**

**दहा हत्ती आहेत माझ्या नशिबीं !** ' तिच्या ह्या उत्तराचें त्या वेळीं सर्वांना कौतुक वाटलें. पण तिची स्वतः विषयींची ही भविष्यवाणी पुढें खरी झाली.

**तात्या दीक्षित** नांवाच्या प्रसिद्ध ज्योतिषांनीं मनुबाईची जन्मपत्रिका पाहून ' **ही खचित राणी होणार ?** ' असें भविष्य वर्तविलें होतें. व त्याप्रमाणें पुढें खरोखरच **झाशीचे संस्थानिक गंगाधरराव** यांच्याशीं त्यांचा विवाह होऊन सन् १८४२ मध्यें मनूबाई ह्या राणी लक्ष्मीबाई झाल्या. आणि ह्याच लक्ष्मीनें इ. सन् १८५७ मध्यें भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामांत उडी घेऊन दिगंत कीर्ति मिळविली.

लग्नानंतर ११ वर्षांनीं (सन् १८५३) गंगाधरपंत वारले. त्यांस औरस पुत्र नव्हता. म्हणून त्यांनीं देहावसानापूर्वीं **दामोदरपंतास** दत्तक घेतलें होतें. ' माझा दत्तक पुत्र मंजूर करा ' अशी त्यांनीं **रेसीडेंट एलिस** यांची काकुळत केली व प्राण सोडिला. भर तारुण्यांत ( १८ व्या वर्षीं ) प्राप्त झालेल्या या वैधव्यप्रसंगीं राणीसाहेबांस इतकें दुःख झालें कीं, ' **जगज्जननी माझा अगोदर गळा काप** ' असा दुःखोद्गार एकदम त्यांच्या कंठांतून बाहेर आला ! दत्तक मंजूर करण्याविषयीं राणीसाहेबांनींहि फार खटपट केली. परंतु गंगाधररावांच्या मृत्यूनंतर अवघ्या ४-५ महिन्यांतच एलिस साहेबांनीं **झांशी खालसा** झाल्याचें झाशीच्या दरबारांत जाहीर केलें ! त्या दिवशीं राणीसाहेब आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें चिकाच्या पडद्यांत बसल्या होत्या. झाशीचें घराणें इंग्रजांशीं अत्यंत राजनिष्ठतेनें वागलें होतें. म्हणून त्यांचा इंग्रज सरकारच्या स्नेहसंबंधावर विश्वास होता. ' झाशी खालसा झाली ! ' हे शब्द ऐकतांच राणीसाहेबांना अनिवार दुःख झालें. त्या दुःखांत " **मेरी झाशी नहीं दूंगी !** " एवढीच त्या जाळींतील वाघिणीची गर्जना बाहेर ऐकूं आली !

झाशीवर इंग्रज सरकारचा कडेकोट बंदोबस्त झाला. २४५७३८ रु. किंमतीचा खजिना ताब्यांत घेतला गेला. पलटणी मोडल्या गेल्या दारुगोळा यांचा नाश केला गेला आणि राणीसाहेबांस ५००० रु. दरमहा पेन्शन ठरलें. पण त्या मानिनीनें तें स्वीकारलें नाहीं. राजवाड्यांत इंग्रज सरकारची फौज ठेविली गेली. दत्तकाच्या मंजुरीकरितां या पुढेंहि राणीसाहेबांनीं फार प्रयत्न केला. **उमेशचंद्र बानर्जी** व एक युरोपियन गृहस्थ यांस ६० हजार रु. देऊन इंग्लंडांत कोर्ट ऑफ् डायरेक्टर्सकडे पाठविलें. पण ते जे गेले ते गेले ! पुन्हां त्यांचा पत्ता लागला नाहीं. नानासाहेब पेशव्यांचे वकील **अझीमुल्लाखान** यांसही पाठविलें, परंतु ते सेबास्तपूल येथें रशियन फौजेंत मजा मारीत बसले.

या नंतरची राणी लक्ष्मीबाईची दिनचर्या म्हणजे सकाळीं ४ वाजतां उठून ८ वाजेपर्यंत स्नान व पूजा, ८ ते ११ चौकांत ५ घोडे फिरविणें, ११ वाजतां पुन्हां स्नान, जेवण व ३ वाजेपर्यंत अष्टगंधानें रामनाम लिहून माशांस टाकणें, सायंकाळीं ८ वाजेपर्यंत पुराणश्रवण, भेटी वगैरे. नंतर पुन्हां स्नान, पूजा व भोजन, असा राणीसाहेबांचा नित्यक्रम असे. **महालक्ष्मी हें त्यांचें कुलदैवत** असल्यामुळें त्या दर शुक्रवारीं निरशन करून महालक्ष्मीच्या दर्शनास जात.

राणी लक्ष्मीबाईसाहेब यांच्या संक्षिप्त चरित्राचा पूर्वार्ध येथें संपला आणि त्यांच्या ज्या चरित्रानें त्या अजरामर झाल्या, त्या चरित्राचा आरंभ १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धापासून झाला. डमडम, बऱ्हामपूर, मिरत, दिल्ली वगैरे ठिकाणीं शिपायांच्या बंडाची आग पसरतां पसरतां तिची ज्वाला झाशीस येऊन पोंचली ! तेथल्या फौजांनीं आपल्या इंग्रज अधिकाऱ्यांस गोळ्या घातल्या व बंडाचें निशाण उभारिलें ! या वेळीं लक्ष्मीबाईनीं कितीक गोऱ्या लोकांना व त्यांच्या बायका-मुलांना आश्रय देऊन त्याचें रक्षण केलें. त्यांस अन्नदान व प्राणदान दिलें. ती वेळ मोठ्या

धांदलीची व आणीबाणीची होती. बंडवाल्यांनीं राणीच्या वाड्यास वेढा घातला. राणींनें सागरच्या कमिशनरकडे 'झाशीची काय व्यवस्था करावयाची ' म्हणून विचारणा केली. उत्तर येईपर्यंत झाशीच्या कांहीं गोरे लोकांनीं झाशीची व्यवस्था राणीकडे दिली. परंतु त्यांच्या पदरीं इंग्रजी जाणणारा कोणीच हुशार कारभारी नसल्यामुळें पत्रव्यवहारांत भारीच गोंधळ झाला. इकडे बंडाची संधि साधून राणीसाहेबांचे आप्त-संबंधी **सदाशिव नारायण पारोळकर** हे झाशी घेण्यास आले व त्यांनीं झाशीच्या प्रांतांत धुमाकूळ घातला. तसाच वोरछाच्या राणीचा **नथेखां** नांवाचा कोणी सरदार फौजफाटा घेऊन झाशीवर आला. तेव्हां मात्र लक्ष्मीबाईनीं ५००० फौज जमवून व दारुगोळा भरून युद्धाची तयारी केली, व त्या दोघांसही पिटाळून लाविलें. या युद्धांतील राणीसाहेबांचें शौर्य अत्यंत प्रशंसनीय होतें. युद्ध ऐन रंगांत आलें असतां त्या तोफ-खान्यावर स्वतः उभ्या राहून गोलंदाजास उत्साहित करतांना म्हणत होत्या कीं, "**मर्द हो ! बरोबर गोळे मारा, आज जर तुम्ही नथेखांला फिरविला तर शेर शेर सोन्याचें कडें तुमच्या हातांत घालीन !**"

सदाशिवराव पारोळकर व नथेखां या पराभूत झालेल्या शत्रुद्वयांनीं इंग्रज अधिकाऱ्यांची अशी समजूत करून दिली कीं, आम्ही इंग्रज सरकार-करितां स्वतंत्र झालेल्या राणीबरोबर लढलों ! जून-जुलैमध्यें या गोष्टी होत आहेत तोंच सप्टेंबरमध्यें इंग्रज सेनापति **सर ह्यू रोज ह्याची छावणी झाशीस आली.** राणीसाहेबांनीं त्याजकडे अगोदर वकील पाठविला, पण त्या वकिलासच फांशीं देण्यांत आले व झाशीच्या किल्ल्यावर कुलपी गोळ्यांचा भडिमार सुरू झाला.

राणीसाहेबांची राजनिष्ठा येथें दुर्दैवानें संपली व त्या युद्धास सिद्ध झाल्या. त्यांनीं **घनगर्ज, कडकबिजली, भवानीशंकर व नालदार** अशा चार नामांकित तोफांसह किल्ल्यावरून गडगडाट आरंभिला. दारू

तयार करण्याचें कोठार घातलें. परंतु कोणा फितुऱ्यानें किल्ल्यावरील माऱ्याची व दारूची जागा इंग्रजांस अचूक दाखविली. त्यामुळें इंग्रजी तोफांचे गोळे दारूच्या कोठारावर पडून मोठा भडका उडाला. गणेश–महाल, आरसे–महाल, यांच्या ठिकऱ्या उडत असतां आणि शहरांतील सराफ बाजार, मोतीचौक यांतून आगीचे डोंब उठत असतां ही धैर्यशालिनी किल्ल्याच्या तटावर उभी राहून आपल्या लढाऊ सैनिकांस धीर देत होती. हें युद्ध १२ दिवस चाललें होतें. राणीसाहेबांच्या **सापत्न मातुश्री** तोफखान्यावर देखरेख करीत होत्या. मध्यंतरीं **तात्या टोपे** २० हजार फौजेनिशीं राणीसाहेबांच्या मदतीस आले, परंतु अदूरदर्शी-पणानें त्यांचा पराभव झाला. या युद्धांतील राणी लक्ष्मीबाईच्या युद्ध-कौशल्याचे व अलोट धैर्याचे सर्व देखावे डोळ्यांपुढें दिसत असतांहि त्यांचें संपूर्ण वर्णन करण्यास स्थळ नाहीं. झांशीचे तट गेले, झाशीस आग लागली, **कुंवर गोषखान** व **गुलाम खुदाबकस** हे नामांकित गोलंदाज मारले गेले. हें पाहून राणीसाहेबांनीं निवडक लोकांनिशी कोठांत शिर-लेल्या इंग्रजांवर वाघिणीसारखी झेंप घालून त्यांची **कत्तल उडविली.** चोहोंकडून गोळ्या सुटूं लागल्या, तेव्हां त्या पुन्हां किल्ल्यांत परत आल्या. इंग्रजांच्या पलटणींनीं चहूंकडून **हुल्लड चालाविली,** राणीचे तटावरील बरकंदाज मारले गेले व गोरे लोक आंत घुसले. आतां **निभाव लागत नाहीं,** असें पाहून त्यांनीं आपल्या आवडत्या दत्तक **पुत्रास पाठीवर बांधिलें** व उत्तर दिशेनें तटावरून घोडा घालून त्या **इंग्रजांची फळी फोडून निघून गेल्या**! या प्रसंगीं त्यांनीं आपल्या विश्वासू व स्वामिभक्त नोकरांस सांगितलें कीं, **ज्यांस माझ्याबरोबर या स्वातंत्र्य-युद्धांत प्राणार्पण करणें असेल त्यांनींच मजबरोबर यावें.** बाकीच्यांनीं आपले प्राण रक्षण करावे. त्याप्रमाणें कांहीं स्वामिभक्त लोक राणीसाहेबांबरोबर गेले. बाकीचे लोक दोन्ही बाजूंनीं रांगा धरून उभे होते त्यांस **कंठे,**

**कडे, हार इत्यादि अलंकार वाटीत वाटीत** ही झाशीची सौभाग्यलक्ष्मी जात असतां ते **राजनिष्ठ लोक तिच्या वियोगानें ढळढळा रडत होते.** राणीसाहेबांचे सापत्न बंधु पूज्य महाशय **चिंतामणराव मोरेश्वर तांबे** ( जे हल्लीं **नागपुरास आहेत** ) हे त्या वेळीं दोन वर्षांचे होते. त्यांच्या मातोश्रींनीं गोरे लोक आंत शिरलेले पहातांच **चिंतामणरावांस** चौघडींत गुंडाळून **खंदकांत टाकिलें** व आपल्या मुलीच्या पाठोपाठ उडी घेतली ! या दोन्हीं अबलांनीं त्या दोन वर्षांच्या अर्भकासह १४ मैलावरील **गुलसराई** गांवापर्यंत धावता प्रवास केला ! यावरून त्या भीषण प्रसंगाची कल्पना करितां येईल.

राणीसाहेब इंग्रजी पलटणींतून हां हां म्हणतां निघून गेल्यानंतर **लेफ्टनंट बौकर** हा त्यांच्या पाठलागावर निघाला व त्यानें त्यांस झाशी प्रांताच्या सरहद्दीवरील **भांडेरगांवीं** गांठलें. या गांवीं त्या आपल्या **वहिणीकडे थांबून** मुलांस फराळास घालीत होत्या. स्त्रिया ह्या जात्या कोमल असतात खऱ्या, परंतु त्या वेळीं या रणरागिणीची मुद्रा अगदीं बदलून गेली होती. त्यानंतर राणीसाहेबांच्या भगिनीनें आपल्या आप्त-स्वकीयांजवळ बोलून दाखविलें कीं **' मनू मजकडे आली तेव्हां तिच्या मुद्रेकडे बघवत नव्हतें '** शेवटची भेट म्हणून राणीसाहेबांनीं **वहिणीस आपल्या कमरेची एक कट्यार दिली.** बौकरला पाहतांच त्या वत्सलेनें चपळाईनें मुलास पाठीवर बांधिले आणि बौकरशीं दोन हात केले व त्यास घायाळ करून ती निघून गेली.

११२ मैलांची दौड मारून राणीसाहेबांनीं काल्पीस **नानासाहेब पेशव्यांची** गांठ घेतली. याच दिवशीं स्त्रियांचा रजोधर्म त्यांच्या दुःखास कारण झाला. या वेळची त्यांची स्थिति लिहवत नाहीं. मर्दानी पोषाखांत असलेल्या या शौर्यशालिनीला नानासाहेबांची भेट घेण्यापूर्वीं नेसावयास

दुसरें वस्त्र नव्हतें! झाशीच्या ऐश्वर्यशालिनीला–या भारतलक्ष्मीला तें वस्त्र नानासाहेबाजवळ मागण्याचा प्रसंग यावा काय? नानासाहेब हे लक्ष्मीबाईस आपल्या बहिणीप्रमाणेंच मानीत. त्यांस कळतांच त्यांनीं स्वतः होऊन राणीसाहबांकडे उंची वस्त्रें, तंबू वगैरे सर्व सामान पाठवून दिलें.

काल्पी येथें **तात्या टोपे, रावसाहेब, बांदेवाले नबाब** यांचा मेळ जमला. **राणीसाहेबांचे मातुल** कांहीं कामाकरितां काल्पीस आले असतां त्यांनीं राणीसाहेबांची गांठ घेतली. दुसऱ्या दिवशीं महालक्ष्मीचा कुळधर्म होता. '**कुळधर्माकरितां उद्यां राहून जावें**' असें राणीसाहेबांनीं सांगितलें असतां त्यांनीं जाण्याची त्वरा दर्शविली. त्यावर '**ठीक आहे आतां तुमची ही शेवटची भेट आहे,**' असें उद्गार काढून त्यांनीं त्यांचा निरोप घेतला. यावरून या स्वातंत्र्य युद्धांत-लढतां लढतां देहार्पण करण्याचा या मनस्विनीचा केवढा दृढनिश्चय झाला होता याची कल्पना होते. त्यांचे मामाही म्हणत कीं 'या वेळीं मनूच्या चेहऱ्याकडे पहावत नव्हतें; **ती चवताळलेली वाघीण दिसत होती.**' जातीची अबला, अवघें २२ वर्षांचें वय, तारुण्याचा भर. अशा स्थितीमध्यें सर्व ऐश्वर्याचा नाश व घोर संकट यांनीं लवमात्र विचलित न होतां मुलास पाठीवर बांधून काल्पीच्या घनघोर संग्रामांत सर ह्यू रोजच्या नामांकित तोफखान्यापुढें आपल्या २००।२५० लालवर्दीच्या लोकांनिशीं २० फुट अंतरापर्यंत धावून जाणारी ही सौदामिनी **सर ह्यू रोजच्याही स्तुतीला पात्र झाली.** काल्पीचें युद्ध फारच निकराचें झालें. ज्या वेळीं राणीसाहेब आपला उमदा घोडा फेकीत समशेरीचा हात चलाखीनें चालवीत इंग्रज **तोफखान्यावर चढाई करून गेल्या** त्या वेळीं त्यांची ती वीरश्री, तो आवेश, ती मर्दुमकी पाहून पेशव्यांच्या सेनापतीसही स्फुरण चढलें व ते इंग्रजांवर तुटून पडले! तेव्हां एकच रणधुमाळी माजली. राणीच्या माऱ्यानें इंग्रजी सैन्य

मार्गे हटलें व तिच्या धाडसी आवेशाचा भयंकर देखावा पाहून **इंग्रज गोलंदाज स्तब्ध झाले! याप्रमाणें ह्यू रोजच्या** तोंडावर पराजयाचा कामिळा पसरत असतां तो ऐनवेळीं आपला उंटावरचा तोफखाना घेऊन राणीसाहेबांकडे धावत आला व त्यानें आपली बाजू राखिली. तेव्हां-पासूनच उंटांचें महत्त्व त्यास कळून आलें.

याही युद्धांत केवळ अव्यवस्थितपणानें बंडवाल्यांचा पराभव झाला. तेव्हां मार्ग काढण्याकरितां हुलकावण्या देणाऱ्या **राणीला इंग्रजी वीरांनीं पक्कें घेरलें.** परंतु शत्रूची कोंडी फोडून त्या तींतून पार निसटल्या. नंतर रावसाहेब वगैरे हताश होऊन पलायनाच्या विचारांत होते. पण त्या कल्पक व धैर्यवंत **सांग्रामिकेनें** ग्वाल्हेरचा किल्ला सर करण्याची अजब युक्ति काढली व ती शेवटास नेली. ग्वाल्हेरच्या युद्धांत **जयाजीराव शिंदे** आपल्या तोफखान्यासह **बालेघाटी** फौज घेऊन आले होते. त्यांच्या तोफांचे गोळे जेव्हां बंडवाल्यांच्या फौजेंत धडाधड येऊन पडूं लागले तेव्हां एकच गोंधळ उडाला. त्या वेळीं देखील **राणीसाहेबांनीं** सर्वांच्या आधीं शिंद्यांच्या **तोफखान्यावर बेधडक चाल केली.** प्रत्येक वेळीं तोफखान्यावर धाऊन जाणें म्हणजे प्रत्यक्ष काळाच्या मुखांत उडी घेणें होय. असले जें धैर्य धैर्यवंतांतही आढळावयाचें नाहीं तें या प्रबल धैर्यवंतीस कोठून लाभलें होतें नकळे. तिनें तोफांवरील **गोलंदाज कापून काढले** व शिंद्याच्या बालेघाटी फौजेचा धुव्वा उडवून जयाजीरावास भर युद्धांतून पळावयास लाविलें!

ग्वाल्हेरचा विजय महत्त्वाचा होता. दारुगोळा, फौजफाटा, सर्व कांहीं मिळालें होतें. पण रावसाहेब पेशव्यांस तेथें **राज्याभिषेक** करवून घेण्याची बुद्धि झाली! युद्धाची तयारी, दक्षता सर्व कांहीं एकीकडे राहून ग्वाल्हेरीस **ब्राह्मणभोजनें** सुरू झालीं. राणीसाहेबांनीं पेशव्यांस पुष्कळ उपदेश केला,

पण तो सर्व व्यर्थ गेला. शेवटीं **सर ह्यू रोजची** स्वारी तेथें येऊन पोंचलीच. ह्यू रोजनें पहिल्याच धडाक्यानें पेशव्यांची **मुरारची छावणी** सर केली. तेव्हां कुठें **पेशवे** व **तात्या टोपे** यांची धावपळ सुरू झाली ! तात्या टोप्यांनीं करुण वाणीनें राणीसाहेबांची प्रार्थना केली. तेव्हां त्या सद्गदित होऊन म्हणाल्या " **भिऊं नका, मी माझें कर्तव्य करितें, तुम्ही तुमचें कर्तव्य करा.**" त्यांच्या सूचनेप्रमाणें सर्व फौजा एकदम मुकाबल्यास निघाल्या. जिकडे इंग्रजांच्या नामांकित फौजा व तोफखाना होता ती बाजू सांभाळण्याचें काम राणीसाहेबांकडे आलें ! त्यांनीं आपल्या सैन्याची योग्य मांडणी करून घनघोर युद्ध आरंभिलें. पहिल्या दिवशीं तर इंग्रजी सेनापतीचे जोराचे हल्ले, हुलकावण्या, चढाई, वगैरे कशालाच त्या **यशवंतीनें** दाद दिली नाहीं. लेफ्टनंट, क्याप्टन वगैरे इंग्रज लढवय्यांनीं झपाट्यानें घोडदळाचे हल्ले चढवावे आणि बंदुकी ठासलेल्या व संगिनी चढविलेल्या पायदळी तुकड्यांच्या करामतीला अवसर मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. परंतु प्रत्येक वेळीं त्यांचा हा कावा ओळखून राणीसाहेबांनीं आपल्या मोर्चांचा बंद तुटूं न देतां पुढें सरून '**घेमार**' करावी ! असा प्रकार सर्व दिवसभर चालला. शेवटीं त्या दिवशीं **इंग्रज सेनानी हताश** होऊन छावणींत निघून गेले.

दुसऱ्या दिवशीं अवसानघातकी **पेशव्यांनीं** आपले मोर्चे हालविले, व ती आवई चोहोंकडे पसरतांच राणीचे लोक मोर्चे टाकून पळूं लागले. तेव्हां त्यांस आपली '**इतिश्री**' कळून चुकली. उरलेल्या लोकांनिशीं त्या झुंजत होत्या, फळी फोडण्याचा प्रयत्न करीत होत्या व इंग्रज झुंजार तो यत्न सिद्धीस जाऊं देत नव्हते. शेवटीं बिजली कडाडली व **राणी लक्ष्मीबाई फळी फोडून निघाल्या** ! तोंच हुजर्स स्वार चित्त्यासारखे त्यांच्या मागून धांवले. थोड्याच अंतरावर झटापट झाली, कांहीं मुडदे

खालीं पडले व ती **वायुकन्या** पुन्हां दृष्टिआड झाली ! तों " बाईसाहेब, मेल्यें, मेल्यें ! " म्हणून सुंदर दासी ओरडली. तिच्या पाठींत गोळी घुसून ती ठार झाली. तें करुण दृश्य पहातांच पुन्हां **लक्ष्मीबाईनीं आपला घोडा वळविला** व त्या स्वारास ठार केलें आणि घोडा फेकला. तों पुढें एक लहानसा नाला आला. तेथें तो **शिंदेशाही** घोडा अडून उभा राहिला ! कांहीं केल्या पाय उचलीच ना !

त्यांचा नेहमींचा आवडता घोडा दोन दिवसांपूर्वी युद्धांत मेला होता. राणीसाहेब चटकन् खालीं उतरल्या व लगाम धरून त्याला पुढें नेऊं लागल्या. परंतु तो पर्वतासारखा निश्चल उभा ! इतक्यांत **हुजर्स स्वारांची** दुसरी टोळी येऊन पोंचली, तेव्हां त्या चटकन् घोड्यावर चढून युद्धास सिद्ध झाल्या. तरवारीवर तरवार आदळून **निकराची झटापट** सुरू झाली. एका **अबलेवर** अनेकांचे घाव पडले. राणीसाहेबांची कवची विदीर्ण होऊन त्यांचा एक नेत्र बाहेर आला. तोंच दुसऱ्या एकानें **किराचीची हूण** त्यांच्या छातींत मारिली. मारतां मारतां **एक स्वार** राहिला होता. त्यालाहि साफ करून ही **झांशीची संग्रामदेवता ग्वाल्हेरच्या रणशय्येवर निजली** ! राणीसाहेबांबरोबर ' देशमुख ' या नांवाचे विश्वासू नोकर होते. त्यांच्या घोड्यावर लक्ष्मीबाईंचे प्रियपुत्र **दामोदरराव** होते. देशमुखांनीं जवळच्या **गंगादास** बुवांच्या मठांतून तांतडीनें **गंगाजल** आणून त्यांच्या **तोंडांत घातलें** त्या **भारतलक्ष्मीनें** एकवार **पुत्राकडे पाहिलें** आणि परलोकीं प्रयाण केलें ! अगोदरच सांगून ठेवल्याप्रमाणें देशमुखांनीं जवळच्याच गवताच्या गंजींत राणी-साहेबांच्या त्या **पवित्र देहास** अग्नि दिला !

मराठी ... 
दा. क्र. ८६०.०
संग्रह शाखा (दुर्लभ ग्रंथ)

# झांशीची संग्रामदेवता

## झांशीवर नौबत झडली !

इ. स. १८५७ सालीं राणी लक्ष्मीबाईनें झांशीचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. तेव्हां झांशी जवळील ओरछा नामक बुंदेले संस्थानचा दिवाण नथेखां, यांस वाटलें कीं, या ब्राह्मणविधवेकडून झांशीचें राज्य हिरावून घेणें कांहीं मोठीशी गोष्ट नाहीं. तो २० हजार फौज घेऊन झांशीच्या रोखानें आला. व त्यानें राणीस निरोप पाठविला कीं, 'इंग्रज सरकारनें तुम्हास जें पेन्शन देऊं केलें होतें तें आम्ही देतों. झांशीचें राज्य आमच्या स्वाधीन करा.'

नथेखांच्या या निरोपानें त्या मानिनीस मनस्वी संताप आला. तिनें त्यास कळविलें कीं, 'मी शिवराव भाऊंची सून आहें. तुमच्यासारख्या बुंदेले लोकांस बायका करून सोडण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं आहे.' या निरोपाबरोबर त्या रणोत्साहिनीनें पांच गोळ्या व मूठभर दारूहि पाठवून दिली !

नथेखांचा क्रोधाग्नि प्रज्वलित होऊन तो झांशीच्या वेशीजवळ येऊन थडकला. त्या सांग्रामिकेनेंहि लागलीच जवाहिरसिंग कटिलेवाले, रघुनाथसिंग जरैय्या, दिलीपसिंग, धीरजसिंग वगैरे आपल्या नामांकित सरदारांस व गोषखान वगैरे गोलंदाजांस बोलावून

किल्ल्याच्या बुरुजांवर तोफांच्या मारागिरीची व्यवस्था केली. युद्धास आरंभ झाला. नथेखांचा जरिपटक्याचा हत्ती माऱ्याच्या कक्षेंत येतांच गोषखानानें राणीच्या 'हूं' या हुकुमासरसा त्यावर नेमका गोळा फेकला ! त्या गोळ्यानें खानाच्या माहीमरातबाचा हत्ती ठार होऊन जरिपटका खालीं पडला ! तेव्हां झांशीवर नौबत झडूं लागली !

नथेखांनें मागें सरून पुन्हां किल्ल्यास वेढा घातला आणि किल्ल्याच्या वोरछा दरवाजावर चार तोफांची फैर लावून किल्ल्यावर चहूंबाजूंनें हल्ला चढविला. दरवाजाला जरब बसून तो शत्रूच्या स्वाधीन होणार हें पाहून राणी तामझामांत बसून स्वतः तेथें आली. तिनें आपल्या लोकांत सोन्याचीं कडीं बक्षिसादाखल वाटून आपल्या वीरश्रीच्या वाणीनें त्यांस उत्तेजित केलें आणि कडक बिजली तोफ आणाविली. त्या प्रचंड तोफेच्या भडिमारापुढें नथेखांचा टिकाव न लागून त्याचा सर्वस्वी मोड झाला व राणी लक्ष्मीबाई ही विजयिनी झाली !

१

झांशीवर फडकत असतां लक्ष्मीची विजय-पताका
उर्छा नगरीची राणी तद्वीर नथेखां बांका
झांशीवर चालुन आला घेवोनी सेना शाखा
अबलेसह झुंजायाची
खुमखुमी बघोनी त्याची
स्वामिनी सजे झांशीची
सूचना रणाची कळली झांशीवर नौबत झडली

२

‘ अंकित व्हायाच्या गोष्टी शिकविशी गुलामा कोणा ?
हिरकणी गिळाया जातां मुकशील आपुल्या प्राणा
दारूसह गोळ्या पांच धाडिला तुला नजराणा ’
अवलाकृत अपमानानें
दुर्मती चिडे क्रोधानें
ठाकला पुढें जोमानें
भगवति युद्धावर चढली झांशीवर नौबत झडली

३

‘ ज्यांच्या नांवानें उठतां झोंपेंत तुम्ही दचकून
शौर्यसिंह ते शिवराव मी आहें त्यांची सून
सिंहिणिच्या कुहरापुढती ठेवावा पाय जपून ’
मस्तकांत उठला शूल
सरकलें पुढें पाऊल
खानानें केली हूल
सावधान—घटिका भरली झांशीवर नौबत झडली

४

धैर्याचे ‘ धीरजासिंग ’ अनमोल ‘ जवाहिरसिंग ’
दिलिपासम शौर्यकृतार्थ ‘ दिलिपसिंग ’ ‘ राघवसिंग ’
राणीच्या विश्वासाचे हे बुंदेले नरसिंह

पीळदार पगडीवाले
पीळदार दाढीवाले
सरदार सजोनी आले
डफ शिंगें जों कडकडलीं झांशीवर नौबत झडली

५

जरिपटका मारगिरींत दिसतांच नथेखानाचा
'हूं' हुकूम गोषखानाला झाला गोलंदाजीचा
तो दुरुस्त अंदाजीचा सरदार तोफखान्याचा
जरिपटक्याच्या हत्तीला
रोखून देई बत्तीला
पडला जरिपटका पडला
रिपुसेना बहु गडबडली झांशीवर नौबत झडली

६

उत्तेजन देई खान सेनेंतुनि सुटले बाण
शरसंधानावर केली बंदुकवाल्यांनीं ताण
जिरविला परी तोफांनीं मर्दुमकीचा अभिमान
आगींत निभाव न लागे
करपले मनाचे धागे
सरकला नथेखां मागें
रोमावळि शरिरीं फुलली झांशीवर नौबत झडली

७

‘ फिरलेला दिसला व्याघ्र धरूं नये भरंवसा त्याचा
घायाळ भुजंगम झाला धरूं नये भरंवसा त्याचा ’
बोलती शहाणे लोक अनुभव आला वचनांचा
झांशिच्या गडाला वैरी
उलटून बलानें घेरी
वाजल्या पुन्हां रणभेरी
वरुनी बिजली कडकडली झांशीवर नौबत झडली

८

चहुंकडून चारी टोळ्या एकदांच करिती हल्ला
दिङ्मंडळ धुंद जहालें अंबरीं धुरोळा गेला
उर्छा दरवाजा वरती तोफांचा मारा झाला
पोंचतां जरब दाराला
लागतां आग बुरुजाला
तामझाम तेथें आला
तेजस्विनि बाहिर पडली झांशीवर नौबत झडली

९

विलसावा नेत्रीं विनय क्रोध अहा ! विलसे तेथें
विलसावी लज्जा वदनीं शौर्य तिथें विलसत होतें
शोभावें कंकण हस्तीं खड्ग तिथें शोभत होतें

रण–चंडीचा रणवेष
पाहुनि तत्समरावेश
सैनिक करिति रणघोष
विजयश्री गालीं हंसलीं झांशीवर नौबत झडली

१०

मोरच्यावरी ठाकोनी ती ललकारोनी बोले
' क्षत्रिय वंशाचे तुम्ही ठाकुरबुंदेलेवाले
हटले न पाहिजे आज रनखेल–मचानेवाले ! '
सरदार शिरोहीवाले
बंदूक-कडाबिनवाले
दमदार कटीलेवाले
सकलांना हिरहिरि भरली झांशीवर नौबत झडली

११

' अनिरुद्धसिंग ' सरदार रुद्ध न झाले त्या समरीं
' रघुनाथ जरैय्या ' त्यांची समशेर न फिरली जहरी
खानहि जोषामधिं चढला रण–दंगल झाली गहिरी
आणवा कडक बिजलीला
घनघोर अशा समयाला
राणीचा हुकुम जहाला
पैजेंत लढाई पडली झांशीवर नौबत झडली

१२

ती प्रचंड ' विजली ' तोफ बिजलीची केवळ भगिनी
आरक्त गोल-सूर्याची भूवरी भासली जननी
अग्नि-तप्त केली तीनें आकाश-मेदिनी दोन्ही

गोळे जों विजयी होती
गोलंदाजांच्या हातीं
कांचन-वलयें अर्पी तीं

वीर-मती विजयी जडली झांशीवर नौबत झडली

१३

सागरांत पडतां कडपा कण कण उधळति वेगानें
किंवा काचेवरि धोंडा शकलें उधळति वेगानें
खंड खंड झाले देह प्रत्येक तोफ—गोळ्यानें

खानाचे गोलंदाज
जरि होते हिंमतबाज
टाकून पळाले साज


शत्रूची हिंमत सुटली झांशीवर नौबत झडली

१४

उन्मत्त नथेखानाच्या हृदयावरि उठले फोड
उतरले शिपाई खालीं जाहली लांडगेतोड
राणीच्या या विजयाला इतिहासीं नाहीं तोड

भारत–लक्ष्मीच्या निटिलीं
विजयाची रेखा पहिली
या लक्ष्मीनें जैं लिहिली

तैं विजय–घोषणा घडली झांशीवर नौबत झडली



# " आवडती माझी झांशी "

ज्या दिवशीं **झांशी** खालसा झाल्याचें मेजर एलिस यांनीं झांशीच्या दरबारांत जाहीर केलें, त्या दिवशीं राणी **लक्ष्मीबाई** ह्या चिकाच्या पडद्याआड बसल्या होत्या. त्या वेळीं त्यांस किती दुःख झालें असेल? त्या दुःखांत "मेरी **झांशी** नहीं देऊंगी!" असे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले!

१

होईल खालसा झांशी कीं होइल दत्तक मान्य
आशा कीं भव्य निराशा प्रश्न हाच चिंताजन्य
ऐकाया निर्णय आले पुर–वासीही सन्मान्य
'खालसा जहाली झांशी!'
झोंबले शब्द लक्ष्मीशीं
बोलली रेसिडेंटाशीं
'देणार नाहीं कोणाशीं आवडती माझी झांशी'

२

आशेचा ताजमहाल कोसळून खालीं पडला
न्याय–नीति दोघांमधला सोपान–मार्ग ढांसळला
सौख्याचा उडता हंस कायमचा उडुनी गेला

झांशीचे संगर-धीर
आठवले पूर्वज वीर
नेत्रांत चमकलें नीर
बोलली प्रीति विरहाशीं 'आवडती माझी झांशी'

३

ज्या झांशीसाठीं आम्ही खड्गाचें पाणी प्यालों
यत्स्वातंत्र्याच्या समरीं रक्तानें कितिदां न्हालों
स्वर्गाच्या द्वारावरतीं यत्कीर्ति लिहूनी धालों
मी विधवा अबला ऐशी
जाऊं तरि कोठें कैशी ?
अन्याय कथूं कोणाशीं ?
शूरता वदे दैवाशीं 'आवडती माझी झांशी'

४

काळानें नेला पुत्र तो उदरीं शिरला घाव
विधि तोडी मंगळसूत्र तो कंठीं बसला घाव
कुलराज्यश्री मावळली हा असह्य शीर्षी घाव
वेदना भयंकर झाल्या
ठाऊक तिच्या त्या तिजला
ना वर्णवती कोणाला
घोळती शब्द कंठाशीं 'आवडती माझी झांशी'

५

स्वामिनिष्ठ सेना तुटल्या राजनिष्ठ ढळढळ रडले
द्रव्याचे खजिने गेले कोषगारही हळहळले
अपहार मदाचा डौल हुकुमाची भाषा बोले
हंसीची सत्ता गेली
परक्यांची सत्ता आली
यक्षिणिची कांडी फिरली
हंसीचे बोल उदासी ‘ आवडती माझी झांशी ’

६

सिंहिणिच्या कुहरामाजीं बिनधोक मतंगज शिरले
नागिणिच्या वारूळांत आनंदें मूषक घुसले
दुर्गेच्या दुर्गम दुर्गीं दैत्यांनीं ठाणें दिधलें
काल ‘ राजलक्ष्मी ’ सार्थ
आज नांव ‘ लक्ष्मी ’ मात्र
विधि—लीला होय विचित्र
लागली आंच हृदयाशीं ‘ आवडती माझी झांशी ’

# ' मर्दानी झांशीवाली '

झांशी खालसा झाल्यानंतर १८५७ साली स्वातंत्र्य-लक्ष्मीनें संचरित झालेल्या झांशीच्या **लक्ष्मीनें** सर ह्यू रोज सारख्या रणकलापटूशीं १२ दिवस सारखें युद्ध केलें. इंग्रजांनीं झांशीवर कुलपी गोळ्यांचा भडिमार केला. किल्ल्यांतील दारूचा भडका उडाला. साह्याला आलेल्या **तात्या टोप्यांच्या** २० हजार फौजेचा पराजय झाला आणि शेवटीं तटाचा मुख्य दरवाजा फुटून शहरांत व तटावर गोऱ्या फौजेनें प्रवेश केला ! या संकटपरंपरेनें धैर्यवंतांचेंसुद्धां धैर्य ढांसळावयाचें; पण त्याच वेळीं ही धैर्यमेरूवरील अविचल तारा कमरेची नंगी तरवार उपसून तटावर छातीचा कोट करून लढली. तेथून बेफामपणानें शत्रूच्या पाठोपाठ शहरांत घुसली व तेथें त्यांची गर्दनबाजी केली. तिच्या समशेरीला भिऊन पळालेले इंग्रज जेव्हां दुरून लपून छपून गोळ्या घालूं लागले तेव्हां तिनें आपल्या ढाला किल्ल्यांत फिरविल्या. तिच्या शौर्यानें आनंदित झालेल्या सर ह्यू रोजनें ' **मर्दानी झांशीवाली** ' असा तिचा गौरव केला.

१

झांशीच्या कुहरामध्यें सिंहीण निजे घायाळ
गर्जना उठे भंवताली स्वातंत्र्येच्छूंचा काळ
लावाया भाग्य कसाला तेजस्विनि करि कल्लोळ

बुरुजा बुरुजावर मोर्चे
बांधोनीया तोफांचे
सजविलें सैन्य शूरांचें
आपणही वेषें सजली मर्दानी झांशीवाली

२

यत्कर परिचित झालेले खड्गाच्या भव्य मुठीस
यत्कर्ण सदा उत्साही ऐकाया रणघोषास
यन्नेत्र नित्य अनुरागी आरक्त रणस्थानास
' ह्यू रोज ' आंग्ल नरवीर
झांशिच्या तटावर शीर
आपटून झाला जेर
हिंदींत बोलला बोली ' मर्दानी झांशीवाली '

३

गर्नाळी कुलपी गोळे खदिरांगारासम सुटले
पसरली लाल चादर कीं अंधाऱ्या रात्रीं गमलें
धुम्-धडड्ड्-धडड्ड् नादें आकाश भरोनी गेलें
' घनगर्ज[१] ' तोफ जैं गर्जे
मोर्चावर गोरे जे जे
त्यांच्यांत पलायन माजे
विजयिनी जयें फुरफुरली मर्दानी झांशीवाली

१ झांशीच्या किल्ल्यावरील नामांकित तोफ.

४

फितुरानें केली मात कलिजास पोंचला हात
दारूच्या कोठारांत जेजालांची बरसात
किल्ल्यांत आणि नगरांत मृत्यूचा प्रळयाकांत
शहराला जागोजागीं
लागल्या भयंकर आगी
पाहिली प्रजा हतभागी
वात्सल्यें हृदयीं द्रवली मर्दानी झांशीवाली

५

'बोलवा गोषखानाला[१] बोलवा खुदाबक्साला[१]
गरगंजाच्या बुरुजाला आणवा कडकबिजलीला[२]
भूतो न भविष्यति ऐशी उडवा दक्षिण बाजूला
जों तिसरा सुटला बार
तों कर्नल झाला ठार
नंतर चमके तलवार
तलवारीवरही लढली मर्दानी झांशीवाली

१ हे राणी लक्ष्मीबाईच्या तोफांवरील हुषार गोलंदाज होते.
२ झांशीच्या किल्ल्यावरील नामांकित तोफ.

६

पडघम बिगुलांच्या नादीं        शिंगें कर्णांचे नाद
खालीं वरती भरलेला        संग्रामाचा उन्माद
चढत्या ईर्षेच्या शब्दीं        चढत्या विजयाचे शब्द
जातीची अबला होती
युध्द्कला ठाउक नव्हती
प्रबलांची केली माती
इतिहासीं गाजुनी गेली        मर्दानी झांशीवाली

७

उत्तरेस धुरळा दिसतो        आशेनें राणी पाहे
'तात्या टोपे आले का?'        उत्कंठा लागुन राहे
तों 'तात्या आले आले!'        आनंद गडांत न मावे
टोप्यांनीं टोपीवाले
समशेरीवरतीं धरिले
एकदांच चालुन गेले
इकडे चपला चकमकली        मर्दानी झांशीवाली

८

युक्ती—युक्तीचें युद्ध        शक्तीला गिळुनी बसलें
पहिलीच फळी जों आली        फोडून रिसाले गेले
'दे माय धरणि गे ठाव'        ऐसें सकलांना झालें

स्वारांचा पायदळाचा
हल्ला चढला जोराचा
दळभार पळे तात्यांचा
थरकेना हिंमतवाली मर्दानी झांशीवाली

९

द्वादश दिवसांपर्यंत एकटीच झुंजत होती
साह्याला टोपे आले त्यांची गति ही उफराटी
सर ह्यू रोजाच्या कुमकीं दररोज पलटणी येती
अंगाची होउन लाही
कर्तृत्वशक्तिला वाही
भवितव्यतेस ना पाही
भीतीही तिजला भ्याली मर्दानी झांशीवाली

१०

धैर्याच्या मेरूवरची तेजस्वी अविचल तारा
शौर्याच्या जलनिधिवरची भीषण सिंधूची धारा
जमवोनी संगरशूरां बोले ती धीरोदारा
' व्यर्थ ती परांची आस
आपुल्या बळाची कास
घालून जपा झांशीस '
उठली आवेशें भरली मर्दानी झांशीवाली

११

पायजमा पायीं शुभ्र गहिरा अंगरखा अंगीं
कमरेस दुपेटा भारी समशेर लटकली जंगी
शोभली शिरीं चंदेरी सुंदर बत्ती नारिंगी
झांशीच्या सौभाग्याची
मूर्तिमंत लक्ष्मी साची
देवता रणस्थानाची
किल्ल्यांतुन बाहिर आली मर्दानी झांशीवाली

१२

इंग्रजी रिसाले पुढतीं क्यांटिजंट फौजा मागें
दारावर दौडत आले लेफ्टनंट कर्नल वेगें
इकडे ही हुल्लड; तिकडे बावटा तटाला लागे
अरबांची बुंदेल्यांची
कर्नल क्याप्टन गोऱ्यांची
पाहून झुंज निकराची
उफळोनी नागिण आली मर्दानी झांशीवाली

१३

पहिल्या झेपेनें घेई ‘मिकलीजाना’ची जान
दुसऱ्या उसळीनें घेई ‘बोनस-फॉक्सां’चे प्राण
‘डीकाला’ केला शीक रडून हात मारून

'स्टूअर्ट' 'लोथ' दोघांनीं
गर्दीत शिड्या लावोनी
चढविलें सैन्य पाहोनी
चवताळुन वाघिण गेली मर्दानी झांशीवाली

१४

गिरिवरची जैसी सरिता तट भिजवित पुढतीं जाते
झंजावाताची लहरी उच्छेदित वृक्षां जाते
घनमंडलिं जैशी बिजली जेथें तेथें लखलखते
कीं भूकंपाची लहरी
अचलांसहि कांपविणारी
सर्वत्र फिरे अनिवारी
संवेगिनि तैशी गमली मर्दानी झांशीवाली

१५

आरक्त उषा ती गमली आरक्त चंडिका गमली
संतप्त भासली संध्या संतप्त भासली काली
संक्षुब्ध तिच्या नेत्रांत क्रोधाची चढली लाली
लखलखाट मार्तंडाचा
चकचकाट पूर्णेंदूचा
दाविला खेळ तेजाचा
रक्तानें शरिरीं न्हाली मर्दानी झांशीवाली

१६

पुढचा दरवाजा फुटला — बाणीचा तटही गेला
सुंदरिचे हात न पुरले — अष्टदिशा सांवरण्याला
कावरीबावरी झाली — शहरांत घोळका घुसला
शत्रूच्या पाठोपाठ
अरबी लढवय्यांसहित
घातली उडी शहरांत
करिती कत्तल हिय्येवाली — मर्दानी झांशीवाली

१७

छातीस लागतां छाती — संगीन सरकली मागें
तरवारीवर तरवार– — खणखणाट होऊं लागे
अरबांनीं बेहोषानें — शिरकटाइ केली वेगें
सरमिसळ होउनी राणी
गर्दनबाजींत शिरोनी
गेली होती रंगोनी
शिरशिरी भरोनी लढली — मर्दानी झांशीवाली

१८

झाडांच्या मागें कोणी — झुडुपांच्या मागें कोणी
पडवीच्या मागें कोणी — वळचणिच्या मागें कोणी
भीतीनें लपुनी–छपुनी — सोडिती बंदुका दुरुनी

चहुंकडून आल्या टोळ्या
त्यांच्याहि सुटती गोळ्या
किल्ल्यांत फिरविल्या ढाला
मर्दांना मर्दुनि गेली मर्दानी झांशीवाली

१९.

रणकलाकुशल वीरांनीं कौशल्य गाइलें जीचें
गुणवंत ग्रंथकारांनीं ग्रंथिले समरगुण जीचें
पोवाडे गावे वाटे स्वातंत्र्याच्या हिरकणिचे
स्फूर्तीचे वळसे दिधले
मृत पौरुष जागृत केलें
हतबल बलवंतही केले
भारतास भूषण झाली मर्दानी झांशीवाली

# “ घनगर्ज ”

सातव्या दिवशीं तर विलायती तोफखान्यांनें झांशीवर कहर करून सोडिला. बुरुजावरील मोर्चावर मनुष्य ठरेनासा झाला! तेव्हां **लक्ष्मीबाईनें** तोडीस तोड देण्याकरितां आपली नामांकित “ **घनगर्ज** ” तोफ सुरू केली. तिच्या भीषण गडगडाटानें दशदिशा दणाणून गेल्या व भयंकर भडिमारानें इंग्रजांचा तोफखाना बंद पडला; इतकेंच नव्हें तर **सर ह्यू रोजला** आपली छावणी मान्यांतून मागें घ्यावी लागली !!

१

जैं विलायती तोफांनीं झांशीचे केले हाल
पेटला गणेश-महाल पेटला विलास-महाल
ऐश्वर्य आणि सुंदरता— फुटलें फुटलें तद्भाळ
‘ घनगर्ज ’ शत्रुसंहरिणी
जणुं काळाची ती भगिनी
मोर्चांत तिला ठांसोनी
प्रगटतां लक्ष्मिचा कोप घनगर्ज गर्जली तोफ !

२

भूधर शेषाचें शीर्ष भीतीनें कांपविणारी
नाभीकमलाच्या विधिला चल-विचलित जी करणारी
देवांच्या सम्राटाचें सिंहासन हालविणारी

गर्जना अशी जैं झाली
स्त्रीगर्भहि ढळले खालीं
धडकी वैऱ्यांना भरली
पळतांना करिति विलाप 'घनगर्ज गर्जली तोफ !'

३

धीरांचें सुटलें धैर्य वीरांचें थिजलें वीर्य
प्रगटलें परचमूमध्यें भीषण काळाचें क्रौर्य
सर ह्यू रोजाला गमलें तें संकट बहु अनिवार्य
नभ तदा प्रतिध्वनि देई
दिग्गिरी प्रतिध्वनि देई
महि नभास भेटूं पाही
ऐसा दावित प्रताप घनगर्ज गर्जली तोफ !

४

झांकून सूर्य-गोलाला चमकवी गोलसूर्यातें !
उडवीत मागुनी ठिणग्या दिवसाच मिरवि तारांतें !
त्या ग्रीष्मऋतूच्या कालीं उभवी वर्षाकालातें !
कर्तुमकर्तुम् शक्तीचा
यत्प्रभाव कुंठवि वाचा
चढुनी शिखरीं त्वेषाच्या
पाप्यांचें मोजित पाप घनगर्ज गर्जली तोफ !

५

दुर्बीण लाविली ज्यानें त्यावरीच धरिला नेम
उडविला यशस्वी बार दाविलें यमाचें धाम
पळतांना मोर्चेवाले झाले किती घामामूम
पैजीवर लावुन पैज
चतुराई गोलंदाज
दाखवीत होते आज
प्राशून दारुची वाफ घनगर्ज गर्जली तोफ

६

ठासतो एक जों दारू तों दुजा चढवितो गोळा
आगीचा तोडेवाला निरखुन मोहऱ्या-मोहऱ्याला
गडगडाट करण्या लावी त्या निनादिनी तोफेला
प्रत्येक निनादासरसे
धूमकेतु उगवत होते
भीषण नभ भासत होतें
रिपुमदास लावित धाप घनगर्ज गर्जली तोफ

७

रोमांच उठति जों देहीं तों होय देह विच्छिन्न
कांपरें भरें करचरणीं करचरण होति तनुभिन्न
धडकी भरली जों हृदयीं तों हृदय होय संचूर्ण

निर्मनुष्य केले मोर्चे
धमधम्यांत जेजालांचे
सांपळे उभे तोफांचे
अपजयास मारुन थाप घनगर्ज गर्जली तोफ

८

राणीचे गोलंदाज स्फूर्तीच्या शिखरीं चढले
विजयोत्साहाची सरिता राणीच्या हृदयीं खेळे
नेमाचा सुटतां वार 'शाबास बहाद्दर!' बोले
छावणी सरकली मागें
पलटणी सरकल्या मागें
त्या भडिमाराच्या योगें
शमवीत असा रिपुताप घनगर्ज गर्जली तोफ

९

दास्याची कैदासिण जी अस्मान तिला दावाया
परवशता जखिणीच्या कीं ठिकऱ्या ठिकऱ्या उडवाया
या सुवर्णभूमीचें तें स्वातंत्र्य रुचिर राखाया
राजलक्ष्मीची गुणवंती
शूरलक्ष्मि ती यशवंती
घनघोर युद्ध करि अंतीं
तिज द्याया साह्य अमूप घनगर्ज गर्जली तोफ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत



# ‘फेकला तटाहुन घोडा!’

इंग्रजांच्या बलाढ्य फौजेशीं झांशीची **लक्ष्मी** सतत १२ दिवस अमानुष पौरुषानें लढली. शत्रूंनीं झांशीचें तर केवळ स्मशान करून सोडिलें. त्यांची चहूंकडून हुल्लड उठली व ती किल्ल्यापर्यंत पोंचली. किल्ल्याच्या मुख्य दरवाजाचें रक्षण करणारे राणीचे चतुर गोलंदाज ‘**कुंवर गोषखान**’ व ‘**गुलाम खुदाबकस**’ हेहि गतप्राण झाले. आतां हस्तगत होऊन देहाचे हाल करून घेण्यापेक्षां शत्रूची फळी फोडून बाहेर पडावें आणि काल्पीस **नानासाहेब** व **तात्या टोपे** यांस जाऊन मिळावें असा तिचा धडाडीचा निश्चय झाला. तिनें आपल्या प्रिय पुत्रास पाठीवर बांधिलें, आवडत्या खंद्या घोड्यावर चढली आणि बरोबरच्या निवडक धैर्यवान् सेवकांसह तिनें उत्तर दिशेनें भर सैन्यांत तटाहून घोडा फेकला व फळी फोडून निघून गेली! **सर ह्यू रोज**सारखा चतुर सेनापति पण तोहि तिच्या या अचाट धैर्यानें चकित झाला. त्यानें लेफ्टनंट **बौकर** यास तिच्या पाठलागावर पाठविलें. सकाळीं झांशीप्रांताच्या सरहद्दीवर ती मुलास फराळास घालीत असतां **बौकर**ची दौड तेथें जाऊन भिडली. तिनें चपळाईनें मुलास पुन्हां पाठीवर बांधिलें आणि घोडेस्वार होऊन तरवारीच्या पहिल्याच खणाखणींत **बौकरला** घायाळ करून ती निघून गेली!

१

लक्ष्मीचा धैर्यतट अढळ  जरि झांशीचा तट ढळला
तन्निश्चय बुरुज न हाले  एकेक बुरुज जरि पडला
परि वेढ्याच्या पाशांनीं  जखडाया वैरी सजला

काळकंठ जे चिरतील
जीवास जीव देतील
घेऊन असे रणशील
फोडाया दुर्गम वेढा फेकला तटाहुन घोडा

२

मर्दानी बांधुन फेटा चिलखत चढवी अंगांत
जहरी जंबिया कमरेला नंगी समशेर करांत
पाठीस बांधिला पुत्र कुरवाळुनि वात्सल्यांत
'अस्मान फेक' जातीच्या
वेगीं चढत्या छातीच्या
तुरगीं चढली त्वेषाच्या
सरकावुन मागें थोडा फेकला तटाहुन घोडा

३

नभ विदारुनी तेजस्वी ही वीज उडाली काय
भीमाच्या हातामधली कोसळे गदा कीं काय
निखळुनी स्वर्गद्वाराची अर्गलाच पडली काय
क्षण भास असा तैं झाला
प्रत्येक पहारेवाला
विस्मित होऊनी ठेला
दाखवीत गगनक्रीडा फेकला तटाहुनि घोडा

४

दचकले कडाबिनवाले गोंधळले बंदुकवाले
सरले समशेरीवाले हटलेही संगिनवाले
उधळोनी सिंहिण गेली चित्रापरि सारे ठेले
जों मान वळवुनी बघती
तों प्रभावती लक्ष्मी ती
जाय दिक्पथाच्या अंतीं
तो अडला नाहीं थोडा फेकला तटाहुन घोडा

५

शत्रूची विजयी टोपी टापेनें उडवून दिधली !
उतरली मिशी चढलेली प्रबलांतुन अबला गेली !
लेफ्टनंट बौकर धावे स्वारांची घेउन टोळी !
वायूची लहरी चाले
दर्याची लहरी हाले
अधिकाधिक अंतर पडलें
रागांत नवल करि वेडा फेकला तटाहुन घोडा

६

भिडविली एकदां मांड रतिभरही चळली नाहीं !
मारिली एकदां टांच ती पुन्हां शिवविली नाहीं !
रिकिबीचा चढता पाय थोडाहि लवला नाहीं !

अनिनीच्या झटक्यावरती
घोड्याला खुणवित होती
शर्यतींत धांवत होती
तिज काय अडवि नदि-ओढा फेकला तटाहुन घोडा !

७

देह जरी चाले पुढती प्राण तरी होता पृष्ठीं
चौखूर उधळतां घोडा तोडुन धरी सुत-यष्टी
तो कण्हून 'आई !' वदतां अंतरांत होई कष्टी
सोडिला तिनें दौलतिचा
वाडा तो समृद्धीचा
परि एकच तो जीवाचा
पाठीला घेउनि वाडा फेकला तटाहुन घोडा !

८

सारीत तमःपट आली ती उषा पूर्व-दिक्क्षितिजीं
स्वातंत्र्य-गोल सूर्याचा सरसरला व्योमामाजीं
आवरी जरा लक्ष्मी ती झांशिच्या सिमेवर वाजी
सोडिला बाळ पाठीचा
घास त्या दिला प्रेमाचा
दिसला घोडा वैकरचा
ही तेव्हांची रिपु–पीडा फेकला तटाहुन घोडा !

९

चपला जों चपळाईनें पाठीस बांधिते बाळ
मारिते टांच घोड्याला तों बौकरी भिडला काळ
मारिला हात उलटून उलथला दुष्ट घायाळ
वृक्षांच्या शिखरावरुनी
उधळली धूळ पसरोनी
दास्याचा पायांतूनी
तेव्हांच तोडिला खोडा फेकला तटाहुन घोडा !

१०

राष्ट्राच्या कल्याणार्थ कल्याणिनि करी कल्लोळ
ती प्रिय भारत—भाग्यार्थ भागीरथि झाली लोल
आर्यांचे बघुनी हाल हालवी मही—दिग्गोल
मर्दानी झांशीवाली
परवशता पायांखालीं
चिरडून निघे जयशाली
स्वातंत्र्याचा मनिं ओढा फेकला तटाहुन घोडा !

# ' झांशीची बीजन[1] झाली ! '

राणी **लक्ष्मीबाई** झांशीहून निघून गेल्यानंतर तिच्या पराक्रमी विरोधानें संतप्त झालेल्या गोऱ्या पलटणी शहरांतून घुसल्या व त्यांनीं ३ दिवस झांशीची बीजन चालविली. त्या भयंकर प्रसंगाचें वर्णन काय करावें ?

१

झांशीची माता गेली पोरकी जहाली झांशी
वात्सल्य–मंदिरीं शिरली पर--निष्ठुरता छळण्यासी
उघडला मृत्यु–दरबार वर्णावें केंवि तयाशीं ?
बाल–वृद्ध कीं स्त्री–पुरुष
कोणीहि दिसो समयास
सरलें त्यांचें आयुष्य
सरसहा चालली गोळी झांशीची बीजन झाली

२

पुरवासी हतभागी ते पळती मार्गामार्गांत
मागून घालती गोळ्या लष्करी यमाचे दूत
कारुण्याचे आलाप विरले वातावरणांत
लागतां पतीला गोळी
फोडित पत्नि आरोळी
तों तत्प्रेतहि ये खालीं
प्रीती रक्तांत बुडाली झांशीची बीजन झाली

१ दिसेल त्यास गोळीनें ठार मारणें.

३

अनिवार जिवाची आशा दुर्बल निःशस्त्र जनांत
तळघरांत कोणी दडती कुणि लपती माजघरांत
शिरले कोणी कूपांत उतरले कुणी वापींत
अंतक आरोळ्या देत
शिरले सदना—सदनांत
उठला एकच आकांत
सदनें रक्तानें न्हालीं झांशीची बीजन झाली

४

सभ्यता नीति मर्यादा सूळावर सगळ्या चढल्या
लावण्यवती किति ललना निज कुलीनतेला मुकल्या
आसुरी अघोरी तृष्णा सर्वस्वी तृप्त जहाल्या
सद्दीचा जोंवर जोर
कोणीही तोंवर थोर
दीनांना नाहक घोर
मृत्यूचे लेखच भालीं झांशीची बीजन झाली

५

पुत्राला कवळित असतां पुत्रासह माता गेल्या
ज्यांचा कर पतिकंठांत त्या पतिसह पत्नी गेल्या
भगिनी-पुढती प्रियबंधू बंधुपुढें भगिनी मेल्या

सूडाची सीमा झाली
शहराची होळी केली
नभ दाटे धूम्र-ज्वालीं
निर्दयता तरिहि न धाली झांशीची वीजन झाली

६

जी ऐश्वर्ये शोभावी उत्तरादिशेची भगिनी
जी शौर्यानें विलसावी दक्षिण देशाची रमणी
जी प्रजा-रंजनीं गाजे पूर्व आणि पश्चिम जननी
ती झांशी होय हताश
कंठास लागला फांस
धिःकार असो काळास
कोणीहि न उरला वाली झांशीची वीजन झाली

७

जीवाचे पंची सारे रुदनाला शब्दच नाहीं
जिकडे तिकडे शव-राशी उचलाया कोणि न येई
प्रेताजवळीं जो जाई त्याचेंच प्रेत तें होई
आनंद-विलासोपवन
जाहलें स्मशानस्थान
धन-धान्य उरे कणही न
लक्ष्मीसह लक्ष्मी गेली झांशीची वीजन झाली

# 'सांभाळा ही तलवार'

राणी लक्ष्मीबाईनीं झांशीच्या तटाहून घोडा उडविल्यानंतर २४ तासांत १०२ मैलांची दौड करून ती काल्पीस पोंचली आणि तेथें नानासाहेब व रावसाहेब पेशव्यांपुढें तिनें आपली तलवार ठेवून दिली. झांशीवर एवढा कहर गुजरला तरी पेशव्यांची मदत झाली नाहीं. यामुळें तिला फार वाईट वाटलें होतें.

१

धूळीनें भरला देह घामाच्या गळती धारा
हृदयास उदासी आली आशेच्या तुटल्या तारा
सूडास निराशा झांकी वणवा तो आंतच सारा
झांशीस चंग बांधोनी
काल्पीस तंग सोडोनी
भेटतां पेशवे दोन्ही
लक्ष्मीचा कंठोद्गार 'सांभाळा ही तलवार !'

२

'आपण दख्खनचे स्वामी आम्ही अपुले सरदार
झांशीवाल्यांच्या कटिला बांधिली तुम्ही तलवार
सेवेला सादर झालों तळहातीं घेउन शीर

आम्ही बुडलों सिंधूंत
सन्निध असतां श्रीमंत
पाहिला आमुचा अंत
कर्तव्यास न आधार सांभाळा ही तलवार

३

जय-सिंह समर-सिंहांचें हें कर-भूषण वीरांचें
स्वातंत्र्य-समरदेवी जी हें अनर्घ आसन तीचें
राष्ट्राच्या द्वारावरचें हें तोरण मांगल्याचें
विधवेच्या हातीं आलें
निर्माल्य जिवाला केलें
निर्माल्य न होऊं दिधलें
उतरला शिरींचा भार सांभाळा ही तलवार

४

चोविस पन्हीच्या तोफा छत्तीस पन्हीच्या तोफा
धाडसी धमक धरणारा तो वीस हजारी ताफा
दळभार फिरे टोप्यांचा झांशीहुन टाकित धारा
असहाय अशा त्या काळीं
संचरतां देहीं काली
हातांत मूठ जी आली
भिजविली तिची मी धार सांभाळा ही तलवार

५

पुरुषसिंह आपण असतां झांशीस लागली फांशी !
प्राणान्त तिची दुरवस्था बघवली तुम्हां तरि कैशी ?
लागतां सुरी कंठाला देहाला निद्रा कैशी ?
पाहिजे समयसूचकता
पाहिजे दूरदर्शकता
त्यांविना ध्येय–निष्फलता
मज दिसे न आतां सार सांभाळा ही तलवार

६

झांशीचा जो इतिहास त्याचीं शेवटचीं पानें
लेखणी करून खड्गाची मीं लिहिलीं नर-रुधिरानें
स्वातंत्र्याच्या दैवाला जागविलें कर्तव्यानें
जरि अपुली मिळती जोड
तरि यशास नव्हती तोड
आतां उठलेले फोड
सलतात अंतरीं फार सांभाळा ही तलवार

७

स्वातंत्र्य-युद्ध शेवटचें झांशीवर झालें जेव्हां
हालली असेल समाधी शिवछत्रपतींची तेव्हां
डोलली असेल समाधी सज्जनगडचीही तेव्हां

आहे हा काळ अनंत
आहे हें विश्व अनंत
झांशीची कीर्ति दिगंत
चिरकाल करील विहार     सांभाळा ही तलवार

८

हिमशृंगें वितळुनि गेलीं     भागीरथि सलिलें भरली
रविकिरण सलिलमय झाले     धनुराकृति सुंदर खुलली
दल- विकसित पद्में झालीं     श्रीलक्ष्मी तेथें नटली
डोळ्यांत आणुनी पाणी
श्रीमंत पेशवे यांनीं
तलवार दिली बोलोनी—
'तुमचाच अम्हां आधार     सांभाळा ही तलवार'

# 'काल्पीस करी कल्पान्त'

**झांशीच्या** तटाहून घोडा फेकून निघून गेल्यानंतर राणी **लक्ष्मीबाईनें** मुलाला पाठीला बांधलेल्या स्थितींत अन्नपाण्यावांचून २४ तासांत काल्पीपर्यंत १०२ मैलांची मजल मारिली. तेथें **नानासाहेब, तात्या टोपे** व **बांदेवाले** नबाब यांच्या फौजांची तिनें विलक्षण रचना करून **काल्पीचा** कोट दुर्भेद्य केला. **पेशव्यांनीं** या सेनेचें आधिपत्य त्या चतुर सांग्रामिकेकडे द्यावयास हवें होतें. तिनें आपले लालवर्दीचे निवडक २०० लोक घेऊन यमुनेकडची बाजू सांभाळली. **तात्या टोपे, बांदेवाले नबाब** यांचा जेव्हां **कुंच** व **काल्पी** यांच्या आघाडीवर पराभव झाला तेव्हां नानासाहेबांसहित सर्वच पलायनाचा विचार करूं लागले! **राणीनें** त्यांस धीर दिला व आपला उमदा घोडा पुढें काढून लालवर्दीच्या लोकांनिशीं **इंग्रजांच्या** नामांकित तोफखान्यावर २० फूट अंतरापर्यंत बेधडक चाल केली व तो बंद पाडला! तिच्या या वेळच्या भयंकर वीरश्रीनें व अचाट पराक्रमानें **कर्नल, कॅप्टन** वगैरे इंग्रज वीर हतवीर्य होऊन रण सोडून पळू लागले! तिनें या काल्पीच्या युद्धांत शौर्याचा कल्पान्त केला. तेव्हां ऐनवेळीं सेनापति **सर ह्यू रोज** हा आपला उंटावरचा तोफखाना घेऊन धांवत आला. त्यानें **पेशवे** व **नबाब** यांना उधळून लाविलें व अशा प्रकारें **राणीची** पिछाडी तोडिली! तरी देखील या तेजस्वी योद्धयाला या एकट्या तेजस्विनीनें चांगलेंच तेज दाखविलें, आणि पुन्हां डोळ्यादेखत घोडा उडवीत निघून गेली!

१

झांशीच्या किल्ल्यांचे पडसाद श्रवणीं येतीं
उन्मत्त शत्रूंचीं कृत्यें हृदयाचीं शकलें करितीं
नाचवीत कोप—भ्रुकुटी काल्पीवर ये लक्ष्मी ती
सागरास आली भरती
धैर्याचे सेतू बुडती
त्यांवरि लहरी नाचे ती
सळसळुन रक्त देहांत काल्पीस करी कल्पान्त

२

टोप्यांनीं केली कूच कुंच्यावर डेरे दिधले
बाणपूर बांदेवाले ढाला बांधोनी नेले
स्वातंत्र्यविजयदेवीचीं उत्साही जमलीं बाळें
शौर्यांत कुशलता नव्हती
धैर्यांत चतुरता नव्हती
मळवून पताका येती
ज्वालेपरि लक्ष्मि नितांत काल्पीस करी कल्पान्त

३

चौफेर उभारुनि तोफा काल्पीचा केला कोट
निवडुनी पठाणी फौजा बांधिला तयांचा गोट
सकलांनीं निश्चय केला यमुनेचा प्राशुन घोट

श्रीमंतांची श्रीमंती
यशवंताची यशवंती
कीं मेघांतिल चपला ती
चमके स्वातंत्र्योद्भ्रांत काल्पीस करी कल्पान्त

४

तोफांस लागतां तोंडे उधळले रिसाले घोडे
बीनीवर निधडे निधडे स्वर्गाचे बघती वाडे
आंग्लवीर गाढे गाढे भीतीनें झाले वेडे
केवळ शौर्याची ज्वाला
काळी जहरी अहि-बाला
गमली सर ह्यू रोजाला
ऐशा शौर्यावेशांत काल्पीस करी कल्पान्त

५

स्वातंत्र्येच्छा ती इकडे तिकडे अधिकारोन्माद
रणभेरी गर्जति इकडे तिकडे बिगुलांचे नाद
निश्चयी वृत्तिचा जोर सूडाला करि अवरोध
दाढीवर चढवून वादी
हायलंडर ते बेदर्दी
छबिन्यावर करितां गर्दी
अधरोष्ठीं चढला दांत काल्पीस करी कल्पान्त

१

झांशीच्या किंकाळ्यांचे पडसाद श्रवणीं येतीं
उन्मत्त शत्रूंचीं कृत्यें हृदयाचीं शकलें करितीं
नाचवीत कोप–भ्रुकुटी काल्पीवर ये लक्ष्मी ती
सागरास आली भरती
धैर्याचे सेतू बुडती
त्यांवरि लहरी नाचे ती
सळसळुन रक्त देहांत काल्पीस करी कल्पान्त

२

टोप्यांनीं केली कूच कुंच्यावर डेरे दिधले
बाणपूर बांदेवाले ढाला बांधोनी नेले
स्वातंत्र्यविजयदेवीचीं उत्साही जमलीं बाळें
शौर्यांत कुशलता नव्हती
धैर्यांत चतुरता नव्हती
मळवून पताका येती
ज्वालेपरि लक्ष्मि नितांत काल्पीस करी कल्पान्त

३

चौफेर उभारुनि तोफा काल्पीचा केला कोट
निवडुनी पठाणी फौजा बांधिला तयांचा गोट
सकलांनीं निश्चय केला यमुनेचा प्राशुन घोट

श्रीमंतांची श्रीमंती
यशवंताची यशवंती
कीं मेघांतिल चपला ती
चमके स्वातंत्र्योद्भ्रांत कालपीस करी कल्पान्त

४

तोफांस लागतां तोडे उधळले रिसाले घोडे
बीनीवर निधडे निधडे स्वर्गाचे बघती वाडे
आंग्लवीर गाढे गाढे भीतीनें झाले वेडे
केवळ शौर्याची ज्वाला
काळी जहरी अहि-बाला
गमली सर ह्यू रोजाला
ऐशा शौर्यावेशांत कालपीस करी कल्पान्त

५

स्वातंत्र्येच्छा ती इकडे तिकडे अधिकारोन्माद
रणभेरी गर्जति इकडे तिकडे बिगुलांचे नाद
निश्चयी वृत्तिचा जोर सूडाला करि अवरोध
दाढीवर चढवून वादी
हायलंडर ते बेदर्दी
छत्रिन्यावर करितां गर्दी
अधरोष्ठीं चढला दांत कालपीस करी कल्पान्त

६

हुजुरातीच्या बाजूला हल्ल्यावर चढवित हल्ले
स्टूअर्ट आणि रॉबर्ट रससावुनी पुढतीं आले
टोपे, नानासाहेब भारतीय शौर्यें लढले
योजून देहसंकल्पा
रोखून भयंकर तोफा
वदती कीं 'कापा, कापा!'
उडविला असा आकांत काल्पीस करी कल्पान्त

७

शत्रुच्या पौरुषावरतीं फेकले निखारे तीनें
डुलणारे मत्त गजेंद्र 'किर्र किर्र' केले तीनें
मर्दुमकीच्या मगरीचे पाडियले दांत बलानें
'पूर्वीच्या निजकीर्तीची
'सेनापति' या पदवीची
लाज कैंवि राखायाची?'
करुनी रिपु चिंताक्रांत काल्पीस करी कल्पान्त

८

लेफ्टनंट, कर्नल वदती 'लक्ष्मीनें केली शर्थ'
हतवीर्य ब्रिगेडिर वदती 'राणी रणचतुर समर्थ'
त्या गुणज्ञ सेनानींना धिक् गमला निजपुरुषार्थ

डोळ्यांत लक्ष्मिची मूर्ति
हृदयांत मृत्युची भीती
बावरून गेली वृत्ती
खड्गावर चढवुनि हात कालपीस करी कल्पान्त

९

कडव्या हायलंडर सेना संगिनिवर जय मिळवाया
पलटणी हैदराबादी बंदुकिचें बल दावाया
वेगानें दौडत आल्या काळाची मोजित छाया
'झांशीचा घ्या घ्या सूड
उकला स्वयशाचें गूढ'
गर्जे ती अश्वारूढ
शिरली कापाकापींत कालपीस करी कल्पान्त

१०

भरंवसा जयांचा त्यांनीं अगदींच गाळले हात!
राखावी पाठ जयांनीं त्यांनींच फिरविली पाठ!
जीवाचे रक्षक सारे शोधिती पळाया वाट!
दाबून अश्व मांडीनें
दाबून खड्ग हातानें
राजेश्वरी संतापानें
उसळली उग्र–रूपांत कालपीस करी कल्पान्त

११

उमद्या घोड्याच्या टापा 'खाड खाड' उडवित आली
प्राशून आग तोफांची मोर्चांत चढाई केली
गोऱ्या तोंडावर गौरी खिन्नता चढविती झाली
ती धरून ज्यावर रोख
करि समशेरीची फेंक
तो सोडी हा भू–लोक
लाली चढली नेत्रांत काल्पीस करी कल्पान्त

१२

नामर्द जाहले मर्द मर्दानीच्या शौर्यानें
हत-विक्रम विक्रमवंत केले विक्रमवंतीनें
पौरुषास पुरुषार्थाला सजविलें प्रभावंतीनें
गिरि गिरीवरी आदळले
घन घनावरी कोसळले
भू-स्वर्ग एक तैं झाले
रक्ताच्या वर्षावांत काल्पीस करी कल्पान्त

१३

सेनानी ह्यू रोजाचा उंटांचा भव्य रिसाला
आगीला वर्षत आला गत-यशास रक्षायाला
जयमरण-निश्चयें सजली ती विदुला संग्रामाला

रणवीर आंग्लनर–योद्धा
रणरागिणि ही कटिबध्दा
अत्यंत जाहली क्रुध्दा
महिषासुरमर्दिनि मूर्त  कालपीस करी कल्पान्त

१४

मोहिनिच्या आविर्भावें  भस्मासुर नाचत होता
यमुनाजललहरी–संगें  कालिया उफाळत होता
ज्योतिष्मतिच्या तेजांत  धूमकेतु चमकत होता
दोनशे लोक राणीचे
पर्वतप्राय देहाचे
शर्थीनें लढले साचे
उत्साह तयांना देत  कालपीस करी कल्पान्त

१५

एकाच चंडिकेवरती  चवताळुन राक्षस गेले
एकाच भद्रिकेभंवतीं  ते अभद्र सारे जमले
ती कल्लोलिनि–तन्मार्गीं  पाषाण आडवे आले
वळसे घेवोनी नाना
उत्सारित सन्नद्धांना
गेली–जातां जातांना
या प्रिय **भारत–भाग्यार्थ**  कालपीस करी कल्पान्त

# पळविला वीर विद्युलेनें

झांशीच्या लक्ष्मीनें काल्पीच्या युद्धांत शौर्याचा कल्पान्त केला, तथापि असहाय स्थितींत तिला आघाडीवरून आपला घोडा फिरवावा लागला. तरीहि त्या धैर्यवंतीचें धैर्य रतिमात्र ढळलें नाहीं. " आतां काय करावें ? " या विचारांत नानासाहेब, रावसाहेब, तात्या टोपे, बांदेवाले नवाब हे पडले असतां त्या कल्पक राणीनें ग्वाल्हेरचा किल्ला सर करण्याची अजब युक्ति काढिली. ग्वाल्हेरचे शिंदे बहुधा आपणांस अनुकूल होतील या भ्रमानें सर्वांनीं ग्वाल्हेर-पासून ५।७ कोसांवर तळ दिला व शिंद्यास निरोप पाठविला. इंग्रज बहादुरांचे राजनिष्ठ तरुण मांडलिक ' जयाजीराव शिंदे ' आपल्या बालेघाटी फौजा घेऊन नामांकित तोफखान्याची गर्जना करीत एकदम युद्धास आले. शिंद्यांचे गोळे छावणींत धडाधड येऊं लागले; तेव्हां कुठें तात्या टोपे सावध झाले ! आपली कल्पना व योजना निष्फल होणार, हें पाहून राणीनें आपल्या निवडक लोकां-निशीं शिंद्यांच्या तोफखान्यावर चाल केली व तो बंद पाडला. शिंद्यांच्या मिजाशी ऐटदार बालेघाटी फौजांचा तिनें धुव्वा उडविला व बुंदेले ठाकूर पलटणीची दाणादाण केली. एका बाजूला राजनिष्ठेनें प्रेरित झालेला तरुण नरवीर आणि दुसऱ्या बाजूला हातांतील तरवार हीच विजय–पताका मानून स्वातंत्र्याकरितां देहार्पण करावयास सिद्ध झालेली एक अबला या दोघांची रणमैदानांत निर्वाणीची झुंज झाली. शेवटीं अपजयी जयाजीरावास जीव बचावण्याकरितां भर युद्धांतून पळावें लागलें. त्यांनीं आग्र्यास जाऊन इंग्रजांचा आश्रय केला !

१

कालपीच्या रणरंगांत रिपु-रुधिरानें नटलेली
ग्वाल्हेरीच्या वेशींत स्वातंत्र्यदेवता आली
तों आंग्ल–राजनिष्ठेची शिद्यांना चढली लाली
तोफांचे उडवित गोळे
जयवंत ' जयाजी ' आले
लक्ष्मीचे फिरले डोळे
उसळली शौर्य–तेजानें पळविला वीर विदुलेनें

२

दिलजान शिकंदर गाझी शिंद्यांचे गोलंदाज
लाल लाल चढवित होते गोळयांचा गगनीं साज
टोप्यांच्या मारगिरीनें कांपले न हिय्येबाज
परि झांशीच्या लक्ष्मीची
उसळतां मांड जोमाची
तोफांत तुमुल रक्ताची–
जाहली वृष्टि वेगानें पळविला वीर विदुलेनें

३

श्रीमंत ' रावसाहेब ' दंगलींत दंग जहाले
सेनापति तात्या टोपे दलभंजनिं मग्न जहाले
शिंद्यांचे दौलतजादे गढले, हटले न हटेले

झाला शत्रूचा जोर
तुटला हिंमतीचा दोर
तो समय पाहुनी घोर
घातली उडी राणीनें पळविला वीर विदुलेनें

४

तिकडे जयशाली योद्धा इकडे दुर्दैवी अबला
तिकडे चमु बालेघाटी इकडे तर लाल रिसाला
तिकडे धुमसे स्वार्थाग्नी इकडे स्वातंत्र्य—ज्वाला
गांठ जैं वीर-विदुलेची
संगरांत झाली साची
तैं होय झुंज निकराची
शेवटीं गलित- धैर्यानें पळविला वीर विदुलेनें

५

हटले जैं बालाघाटी बुंदेले ठाकुर आले
वीरांच्या ढालांवरतीं खड खड नव-खड्ग उडाले
देऊन सलामी त्यांना लढले तैं बांदेवाले
बांधांचा तुटला बांध
शिंद्यांचा विजयानंद
क्षण नाचे जों स्वच्छंद
तों रणलीलावंतीनें पळविला वीर विदुलेनें

६

ती राष्ट्राची भव्येच्छा स्वार्थैक-वृत्तिला चिरडी
ती देशाची संस्फूर्ती उसन्या हिंमतीला रगडी
ती स्वातंत्र्याची शक्ती दास्याची दाबी नरडी
बुंदेले ठाकुर यांचा
कसलेल्या लढवय्यांचा
धीरच सुटला सकलांचा
काढिला पाय शिंद्यानें पळविला वीर विदुलेनें

७

हननोद्यत-कर चंडीचा नाचे नित शीर्षांवरतीं
मर्दानी फेट्यावरतीं शोभती रुधिरमय पंक्ति
लाल लाल वक्षांवरतीं रुळतसे मुक्त-माला ती
अतिरथी प्रवेगें येवो
कुणि महारथीही येवो
तो मुक्तिविना ना राहो
ऐशा संगरलीलेनें पळविला वीर विदुलेनें

८

श्रीशिवभूपाल—भवानी तत्कर—खड्गांत विराजे
शिवनेरीची शिवदेवी देहीं स्फूर्तीनें साजे
'हर हर' समरांगणनाद तत्कंठीं मंगल गाजे

धारा-तीर्थांची जननी
भिजवी युद्धाची धरणी
करि पावन वीर-श्रेणी
मृत्यूच्या भेसुरतेनें पळविला वीर विदुलेनें

९

तरवार तिच्या जी हातीं विजयाची तीच पताका
धार जी तिच्या खड्गाची ती तद्दैवाची रेखा
मूठ जी तिच्या खड्गाची ती आशा-लतिका शाखा
झांशीची ग्वाल्हेरीची
संकल्पित जयकीर्तीची
चकमक झडली जोराची
अंतीं परि यशवंतीनें पळविला वीर विदुलेनें

१०

रंजक जों कानीं येई मोर्चावर घोडा नेई
रण-कंदन जेथें होई फळि फोडुन तेथें जाई
करि मारगिरीची घाई रडवी रिपु धाई धाई
शत्रूच्या भाळीं तीनें
तरवारीच्या टोकानें
अपजय लिहिला रक्तानें
संग्राम-चतुर लक्ष्मीनें पळविला वीर विदुलेनें


११

जयकीर्ती चित्तीं त्यजिली निज सैनिक समरीं त्यजिले
धन-दौलत नगरीं त्यजिली दारा-सुत सदनीं त्यजिले
अपजयी ' जयाजी ' जीव, रक्षोनी मात्र पळाले

हिंदवी भूप ख्रिस्तांत
दिलजान जाहला दोस्त
परि सर्व भरत-खंडांत

जन वदती आश्चर्यानें ' पळविला वीर विदुलेनें ! '

---



# 'राणीचा रणकल्लोळ !'

संग्रामचतुर अशा झांशीच्या **लक्ष्मीनें** रावसाहेब पेशव्यांस ग्वाल्हेरचा विजय मिळवून दिला, नाहीं तर काल्पीच्या पराजयानंतर ते पलायनाच्याच विचारांत होते. तथापि **पेशव्यांनीं** मागचा पुढचा विचार न करितां **ग्वाल्हेरीस** स्वतःचा राज्यारोहण समारंभ आरंभिला व ब्राह्मणभोजनें सुरू केलीं ! याविषयीं राणीनें पेशव्यांची चांगली कानउघाडणी केली. 'आधीं फौजेचा नीट बंदोबस्त करा, इंग्रजी फौज लढाईस आल्यावांचून रहाणार नाहीं.' असेंहि तिनें सांगितलें. पण तिकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं. तिच्या भविष्याप्रमाणें खरोखरच सर चार्लस **नेपीयर** व सर **ह्यू रोज** हे इंग्रज सेनापति ब्रि. **स्मिथ,** क. **रेन्स**, क. **पेली** अशा रणपटु सरदारांसह ग्वाल्हेरपुढें दाखल झाले ! ह्यू रोजनें पहिल्याच धडाक्यानें पेशव्यांची मुरारची लष्करी छावणी सर केली, तेव्हां कुठें हे युद्धाचा पोषाख चढवूं लागले ! सगळीच धावाधाव व पळापळ !

तात्या टोप्यांनीं करुण मुद्रेनें राणीची प्रार्थना केली. सद्गदित होऊन ती म्हणाली—'भिऊं नका ! सर्व फौजा मुकाबल्यास काढा ! मी माझें कर्तव्य करितें, तुम्ही तुमचें कर्तव्य करा !' जिकडे स्मिथ, रेन्स, पेली असे कसलेले योद्धे होते ती बाजू तिनें स्वीकारिली. तिनें आपले मकराणी स्वार, लालवर्दीचे लोक व तुर्की सैन्य यांची विशिष्ट रचना करून रणकल्लोळ उडवून दिला. तो सायंकाळपर्यंत चालला. शेवटीं त्या प्रबल आंग्लवीरांस दुसऱ्या बाजूनें परतून जावें लागलें !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

१

ग्वाल्हेरीच्या विजयानें सर्वांना धुंदी भरली !
राज्याभिषेक करण्याची पेशव्यांस घाई झाली !
लक्ष्मीचीं बोधक वचनें वाऱ्यावर वाहत गेलीं
'जय जय' वदतां सोत्कंठ
जेवती विप्र आकंठ
ये आंग्ल-चमूचा गोट
तैं झाला अति विक्राळ राणीचा रणकल्लोळ

२

छावणी मुरारावरची चातुर्यानें रचलेली
ह्यू रोज धाडसी त्यानें धडकीसरसी सर केली !
युद्धाच्या पोषाखाची इकडे मग धांदल झाली !
'मोर्चे बांधा !' कुणि म्हणती
'तोफा डागा !' कुणि म्हणती
कुणि लक्ष्मीला विनवीती
राखी वाणीची वेळ राणीचा रणकल्लोळ

३

'अजि कर्तव्याची कास बांधावी प्रत्येकानें'
'अजि राष्ट्रभक्तिची शपथ पाळावी प्रत्येकानें'
'अजि भारतभूची लाज राखावी प्रत्येकानें'

‘ भाळावरची विधि- रेखा
कर्तव्यीं रमतां वाचा ’
उपदेश असा लक्ष्मीचा
ऐकून गमे—‘ होईल राणीचा रणकल्लोळ ’

४

हिंमतवानांचा छबिना सेनेच्या पुढच्या भागीं
मग लाल रिसालेवाले त्यांची फळि जागोजागीं
माऱ्याच्या रोखुन जागा तोफांचा कोट उभारी
सेनेची रचना ऐशी
करुनी सजली रणवेषीं
कळलें कीं प्रत्येकाशीं
हरवील अजि स्वर्गोल राणीचा रणकल्लोळ

५

ज्या जागीं इंग्रज गाझी तेथें संमुख ही राणी !
जेथें धिप्पाड रिसाले त्या क्षेत्रीं ही सेनानी !
जिकडे रणपटु तत्सेना तेथें धैर्याची खाणी !
तिकडून वाजला बिगुल
इकडून धडकले गोल
जीवित झालें बिनमोल
अद्भुत शौर्याचा खेळ राणीचा रणकल्लोळ

६

वाजतात पडघम ढोल वाजती कर्ण – तंबूर !
धडकती बार चौफेर गर्जती राक्षसी वीर !
सैनिकांस सैनिक भिडले स्वाराला भिडले स्वार !
त्या चपलेची चपळाई
काटाकाटीची घाई
पाहून गमे नवलाई
मृत्यूचें केवळ मूळ राणीचा रणकल्लोळ

७

पहिली जी तुकडी आली ती सारी गारद झाली
मागची इंग्रजी तुकडी हुलकावणि देउन हटली
तुर्कांच्या बंदूकांनीं तैं निशाणबाजी केली
सूत्रनाळ तोफा हातीं
घेऊन रिसाले चढती
फुगली मकराणी[1] छाती
जिकडे तिकडे तेजाळ राणीचा रणकल्लोळ

८

धावला पुढूनी ‘स्मीथ’ शौर्याची शर्थ करीत
‘रेन्स’ आणि ‘पेली’ मागें वळतात झुकांड्या देत
राणीचे कांहीं लोक हटले भीषण माऱ्यांत

१ राणीचे मकराणी स्वार.

लागला ' रेन्स ' पाठीला
तों खंदक पुढतीं आला
' स्मिथ ' अवसानानें चढला
दिसला त्याला घनघोर राणीचा रणकल्लोळ

९

रत्नखचित तलवारीची दृढ मूठ जिच्या हातांत
अंगरखा नील तमामी भरघोस जिच्या अंगांत
जरतारीचा शिरपेंच शोभतो जिच्या शीर्षांत
वीर्योत्साहाची जननी
झांशीची लक्ष्मी राणी
रण–रंगीं गेली रमुनी
विस्मयांत बुडवी खोल राणीचा रणकल्लोळ

१०

' झांशीच्या सत्पुत्रांनो शाबास शूर मर्दांनो
' दौलतिच्या आधारांनो व्हा पुढें राष्ट्रभक्तांनो '
' अजि मृत्यूला कुणि नेणो कवि तुमची कीर्ती वानो '
उत्साहित करुनी सेना
चालली पुढें बल–हनना
करि परसेनेची छलना
उतरी शत्रूचा डौल राणीचा रणकल्लोळ

११

आकाश शिरावर धुंद भोंवतीं दिशाही धुंद
खालून उठे आक्रंद नाचति योद्धे स्वच्छंद
तुटला न तिचा चमु-बंध वाढे परि समरानंद
लेफ्टनंट कर्नल फिरले
बाजुला ब्रिगेडिर सरले
अंतरांत खोंचून गेले
झाला न असा होईल राणीचा रणकल्लोळ

१२

जो प्रसंग आठवतांच आजही उर:स्थल फाटे
जो समय स्मरणीं येतां अंगावर येती काटे
जो काळ पुढें दिसतांच अंतरांत भीती दाटे
त्या काळीं एकच ललना
प्रबलांच्या करि बलदमना
आश्चर्य गमे सकलांना
तो स्फूर्तिप्रद चिरकाल राणीचा रणकल्लोळ

# ' शेवटची संगरलीला '

महाराणी **लक्ष्मीबाईनें** ग्वाल्हेरच्या शेवटच्या युद्धांत पहिल्या दिवशीं रणकल्लोळ उडवून दिल्यानंतर दुसऱ्या दिवशीं तिचें प्रतिपक्षी सर्व इंग्रज सरदार कृतनिश्चयानें विद्युत्प्रपाताप्रमाणें तिजवर तुटून पडले. प्रथम त्यांनीं आपल्या कवायती फौजा एका खोल दरींत लपविल्या व घोडदळाचा जबरदस्त हल्ला केला आणि मागून पायदळाचे एकामागून एक हल्ले चढविले. राणीनें जिवाचा धडा करून आघाडीवर मर्दुमकीची शर्थ केली. इतक्यांत **सर ह्यू रोज** यानें निकराची चढाई करून पेशव्यांचे मोर्चे जिंकले. ती आवई चोहोंकडे पसरतांच राणीचे लोक मोर्चे सोडून पळाले; तेव्हां तिला आपली इतिश्री कळून चुकली. साहस व धाडस यांच्या जोरावर तिनें पुन्हां कृतांताप्रमाणें चवताळलेल्या शत्रूची फळी फोडिली! तोंच हुजर्स स्वारांची टोळी तिच्या मागें लागली! एक दोन झटापटींत ती स्वारांना ठार करून पार निघाली! पुन्हां तिची ' सुंदर ' नांवाची दासी गोळीला बळी पडली. तिच्या भेदक किंकाळीसरशी घोडा फिरवून तिनें त्याहि स्वारास कंठस्नान घातलें! पण पुढें एक लहानसा नाला आला, तेथें तिचा तो नवा शिंदेशाही घोडा अडला! झटकन् खालीं उतरून त्याला पैलतिरीं नेण्याचा तिनें पुष्कळ यत्न केला, पण व्यर्थ! इतक्यांत हुजर्स स्वारांची दुसरी टोळी येऊन तेथें भयंकर हातघाई झाली. तींत तिच्या डोक्यावर मर्मांतिक प्रहार होऊन कवची विदीर्ण झाली व त्याबरोबर एक नेत्रहि बाहेर आला. तोंच दुसऱ्या एकानें राणीच्या छातींत किराचीची हूण मारिली. अशा विकलांग स्थितींतहि तिनें सफाईचा हात मारून त्या घातकी

स्वारांस आपल्या आधीं स्वर्लोकीं पाठविलें. नंतर ती धरणीवर पडली. तिचे विश्वासू सेवक **रामचंद्रराव देशमुख** हे तिच्या पुत्राचा सांभाळ करीत घोडेस्वार होऊन तिजबरोबर धांवत होते. त्यांनीं तांतडीनें जवळच्या **गंगादास** बुवांच्या मठांतून गंगाजल आणून तिच्या मुखांत घातलें. तिनें एकवार आपल्या प्राणप्रिय मुलाकडे पाहिलें व स्वर्गारोहण केलें. येथें या आद्वितीय राणीची ' शेवटची संगरलीला ' संपली.

१

लक्ष्मीच्या शौर्याग्नीनें संतप्त अती झालेले
निर्धार जयांचा झाला जमले ते टोपीवाले
घायाळ जणो कीं व्याघ्र चवताळुन सारे आले

तो शत्रूचा रणरंग
क्षण करी मनाला गुंग
राणीचें धैर्य अभंग

सजली तीही करण्याला शेवटची संगरलीला

२

हालल्या कवायति सेना लपविल्या दरींत तयांना
तों हुजर्स घोडेस्वार फोडिती चहूं बाजूंना
वाटले प्रभंजन लोट फाडितात दिक्पटलांना

•

# ‘ शेवटची संगरलीला ’

महाराणी **लक्ष्मीबाईनें** ग्वाल्हेरच्या शेवटच्या युद्धांत पहिल्या दिवशीं रणकल्लोळ उडवून दिल्यानंतर दुसऱ्या दिवशीं तिचे प्रतिपक्षी सर्व इंग्रज सरदार कृतनिश्चयानें विद्युत्प्रपाताप्रमाणें तिजवर तुटून पडले. प्रथम त्यांनीं आपल्या कवायती फौजा एका खोल दरींत लपविल्या व घोडदळाचा जबरदस्त हल्ला केला आणि मागून पायदळाचे एकामागून एक हल्ले चढविले. राणीनें जिवाचा घडा करून आघाडीवर मर्दुमकीची शर्थ केली. इतक्यांत **सर ह्यू रोज** यानें निकराची चढाई करून पेशव्यांचे मोर्चे जिंकले. ती आवई चोहोंकडे पसरतांच राणीचे लोक मोर्चे सोडून पळाले; तेव्हां तिला आपली इतिश्री कळून चुकली. साहस व धाडस यांच्या जोरावर तिनें पुन्हां कृतांताप्रमाणें चवताळलेल्या शत्रूची फळी फोडिली! तोंच हुजर्स स्वारांची टोळी तिच्या मागें लागली! एक दोन झटापटींत ती स्वारांना ठार करून पार निघाली! पुन्हां तिची ‘ सुंदर ’ नांवाची दासी गोळीला बळी पडली. तिच्या भेदक किंकाळीसरशी घोडा फिरवून तिनें त्याहि स्वारास कंठस्नान घातलें! पण पुढें एक लहानसा नाला आला, तेथें तिचा तो नवा शिंदेशाही घोडा अडला! झटकन् खालीं उतरून त्याला पैलतिरीं नेण्याचा तिनें पुष्कळ यत्न केला, पण व्यर्थ! इतक्यांत हुजर्स स्वारांची दुसरी टोळी येऊन तेथें भयंकर हातघाई झाली. तींत तिच्या डोक्यावर मर्मांतिक प्रहार होऊन कवची विदीर्ण झाली व त्याबरोबर एक नेत्रहि बाहेर आला. तोंच दुसऱ्या एकानें राणीच्या छातींत किराचीची हूण मारिली. अशा विकलांग स्थितींतहि तिनें सफाईचा हात मारून त्या घातकी

स्वारांस आपल्या आधीं स्वर्लोकीं पाठविलें. नंतर ती धरणीवर पडली. तिचे विश्वासू सेवक **रामचंद्रराव देशमुख** हे तिच्या पुत्राचा सांभाळ करीत घोडेस्वार होऊन तिजबरोबर धांवत होते. त्यांनीं तांतडीनें जवळच्या **गंगादास** बुवांच्या मठांतून गंगाजल आणून तिच्या मुखांत घातलें. तिनें एकवार आपल्या प्राणप्रिय मुलाकडे पाहिलें व स्वर्गारोहण केलें. येथें या आद्वितीय राणीची ' शेवटची संगरलीला ' संपली.

१

लक्ष्मीच्या शौर्याग्नीनें संतप्त अती झालेले
निर्धार जयांचा झाला जमले ते टोपीवाले
घायाळ जणो कीं व्याघ्र चवताळुन सारे आले
तो शत्रूचा रणरंग
क्षण करी मनाला गुंग
राणीचें धैर्य अभंग
सजली तीही करण्याला शेवटची संगरलीला

२

हालल्या कवायति सेना लपविल्या दरींत तयांना
तों हुजर्स घोडेस्वार फोडिती चहूं बाजूंना
वाटले प्रभंजन लोट फाडितात दिक्पटलांना

यशवंती सावध होती
जाणिली रिपूची युक्ती
तोंडावर चालून ये ती
आरंभच ऐसा झाला शेवटची संगरलीला

३

तोफांचा मारा झाला किति देह उडाले नकळे !
बंदुकिच्या फैरी झडल्या किति छात्या फुटल्या नकळे !
संगिनिचे हल्ले चढले किति कपाळ फुटले नकळे !
शाबास तिच्या धैर्याची
शाबास तिच्या शौर्याची
बीनीहुन ढळली नव्हती
साश्चर्य करी शत्रूला शेवटची संगरलीला

४

ऐकतां तिचा मुखशब्द सैन्यगोल हालत होता
दावितां खुणेचें बोट सेनागिरि उसळत होता
दावितां खुणेचें खड्ग मृत्यूशीं झुंजत होता
शर्तीस लागली शर्त
जयतर्क होय अवितर्क
मृत्युचा न भयसंपर्क
आणी रोमांच तनूला शेवटची संगरलीला

५

ती वैकुंठाची रमणी कीं ब्रह्मांडाची माता
स्वर्गस्थांच्या आत्म्यांची शांतिप्रद गंगा सरिता
प्रगटली इथें ती होती मृत्युलोकिं संगरनिरता
कंठीं मोत्यांचा घोंस
पाठीवर रुळती केंस
शरिरीं युद्धाचा वेष
निर्भय खेळे ती चपला शेवटची संगरलीला

६

भ्रुकुटी वरतीं चढलेली डोळ्यांत खून भरलेला
तलवार वरी धरलेली रक्तांत देह भिजलेला
कमरबंद तो कसलेला आवेग अंगिं भरलेला
तोफांचे मोर्चे मागें
त्यापुढें झुंज ही लागे
दोघांतुन एक न भागे
ऐशी आली निकराला शेवटची संगरलीला

७

प्रत्येक भयानक लाट फिरविली कर्णधारेनें
प्रत्येक मर्द वीराला हटविला जवामर्दीनें
पेशव्यांकडीलचि मोर्चे सर केले ह्यू रोजानें

पसरतां चहुंकडे वार्ता
सैनिकांत भय संचरतां
एकेक पाय घे फिरता
मग कळून चुकलें तिजला शेवटची संगरलीला

८

अवसानच सुटलें ज्यांचें त्यांना मग कैचा धीर ?
सदनेच्छू विद्रुत पक्षी कवण त्या करील स्थीर ?
तलवारीच्या यत्नाला हांसलें तदा तकदीर !
अवसानघातकी लोक
तोफा टाकुन कित्येक
फिरले जेव्हां बिनधोक
दावी तीही दैवाला शेवटची संगरलीला

९

झुंजार आंग्ल वीरांनीं घातला गराडा भंवतीं
चंड–मुंड कोपस्फुरित देवीस वधाया बघती
ती शौर्याग्नीची ज्वाला कितिकांना जाळित होती
एकीवर पडतां घाले
भीषण रणकंदन चाले
साह्याला कोणि न आले
वैरिच उरले बघण्याला शेवटची संगरलीला

१०

कडकडून विद्युद्वल्ली निमिषांत लकाकुन जावी
बघतांना वायू नौका गगनांत उडोनी जावी
भरतीची भीषण लाट क्षितिजाला भेदुन जावी
हुतुतूचा दावित खेळ
धूळीचे उडवित लोळ
वेढा फोडी तात्काळ
'हां हां !' वदवी सकलाला शेवटची संगरलीला

११

हय इतुक्या वेगें धावे भूस्पर्श दिसेना त्याचा
तें धाडस ती चपळाई तो प्रकार आश्चर्याचा !
क्षण गेला जों स्तिमिताचा साहस अवलोकायाचा
सुटली स्वारांची टोळी
एकदां लगटही झाली
समशेर तिनें भिजवीली
दचकवी तिची काळाला शेवटची संगरलीला

१२

फिरविला फेकला घोडा वायूची चाले कन्या
भारत–मातेची कूस जाहली तिजमुळें धन्या
कोणाची उपमा द्यावी तिजसम कीं तीच अनन्या

आवडती ‘ सुंदर ’ दासी
बळि पडली ती गोळीशीं
लगटली दुष्ट वैऱ्याशीं
वर्णाया स्वर्गीं गेला शेवटची संगरलीला

१३

दुःखाला नव्हती जागा शोकाला नव्हती वेळ
पुढच्याच पाउलीं दैवें मांडिला भयानक खेळ
तो शिंदेशाही घोडा अडला पाहुन ओहोळ
उतरली त्वरेनें खालीं
युक्तिची शिकस्तहि झाली
घोडा तो पाय न उचली
तेथेंच कराया अडला शेवटची संगरलीला

१४

अत्युग्र भीमकर्म्यांची दुसरी ललकारी आली
दुर्धर स्थितींतच तेथें अवलेवर गर्दी झाली
पाणिदार समशेरीचे आघात जाहले भालीं
खड्गाचे चुकवित घाव
ज्याच्यावर घेई धांव
तात्काळ कालवश होय
ऐशी भीषण विक्राळा शेवटची संगरलीला

१५

खड्गाचा दृढ प्रहार मागून अचानक होई
शीर्षाचें शकल उडालें एक नेत्र बाहिर येई
किरचीच्या दुसऱ्या घायें वक्ष:स्थल फुटुनी जाई
मारून सफाई हात
अंतकास परलोकांत
पाठवी अंत–कालांत
करुनी निजली धरणीला शेवटची संगरलीला

१६

वाहून रक्त अनिवार देहाला ग्लानी आली
अंधारी येऊन नेत्रीं कंठाला कोरड पडली
रणतीर्थीं गंगातीर्थ लाधलें तिला त्यावेळीं
सरक्षित होता पुत्र
एकदां पाहिला मात्र
शेवटीं झांकले नेत्र
दाउन गेली स्वर्गाला शेवटची संगरलीला

१७

तेजाची तारा तुटली शौर्याची ज्योती विझली
कीं जय-ध्वजा कोसळली स्वातंत्र्यश्री मावळली
आशेची मंगलमाला विच्छिन्न होउनी पडली

हीं इतिहासाचीं पानें
वाचवतीं ना नयनानें
भिजतातीं अश्रुजलानें
स्फुरवी परि शाहीराला शेवटची संगरलीला

१८

रणलीला झाली जेथें रणशय्या केली जेथें
अजुनी जन दाविती तेथें 'लक्ष्मी निजली हो येथें!'
संग्रामाचीं तद्गीतें वनमाला अजुनी गाते
तद्गानांतरिचे सूर
जणुं औदास्याचे पूर
प्रगटिती अर्थ गंभीर
'यापुढें भजा शांतीला शेवटची संगरलीला.'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि: काव्य
क्रमांक ........ नोंद दि. ........
REFBK-0009400

— समाप्त —

## ● ● ● आमचीं कांहीं पुस्तकें ● ● ●

### ● कादंबऱ्या ●

| | | रु. आ. |
|---|---|---|
| काश्मिरी गुलाब | प्रा. ना. सी. फडके | ३— ८ |
| सुखाचा शोध | वि. स. खांडेकर | ३— ८ |
| दिव्य चक्षु | कु. रत्नप्रभा रणदिवे | ३— ८ |
| अटकेपार | प्रा. ना. सी. फडके | ५— ० |
| अंधारांतली वाट | बा. भ. बोरकर | २— ८ |
| शिवशाहीचा शुभ शकून | वि. वा. हडप | ३— ० |
| माझें बालपण | मॅक्झिम गॉर्की | ५— ० |
| झोंपीं गेलेला देश | टुर्गेनिव्ह | ३— ८ |
| विभावरी | वि. वा. हडप | ३— ० |
| प्रतिबिंब | दि. चिं. देशपांडे | २— ८ |
| दौलत ( संक्षिप्त ) | प्रा. ना. सी. फडके | २— ० |
| आंधळा न्याय | वि. वा. पत्की | २— ८ |
| जळतें रहस्य | बा. भ. बोरकर | २— ० |
| सती | साने गुरुजी | ३— ० |
| शिवशाहीची पहांट | वि. वा. हडप | ३— ० |
| चित्रकार रंगा | साने गुरुजी | ३— ० |

### ● नाटकें व नाटिका ●

| | | |
|---|---|---|
| उसना नवरा | ना. धों. ताम्हनकर | १— ४ |
| संजीवन | प्रा. ना. सी. फडके | १— ० |
| विदुषी | ना. धों. ताम्हनकर | १— ० |
| आगलावी | प्रा. ना. सी. फडके | ०— ६ |
| गीता—विजय | गं. रा. साने | ०— ६ |
| क्षमेसाठीं अपराध | प्रा. ना. सी. फडके | ०— ६ |
| नोट कुणाची ? | चिं. आ. मुंडले | ०— ६ |
| जडावाची देवी | प्रा. ना. सी. फडके | ०— ६ |
| अणुशास्त्रज्ञावरील खटला | प्रा. ना. वा. कोगेकर | ०—१२ |
| श्रीमंत पतीची राणी | प्रा. रतनलाल डी. शहा | १— ८ |

● ● स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर ● ●

## ● ● ● आमचीं कांहीं पुस्तकें ● ● ●

### ● लघुकथा ●

| | | रु. आ. |
|---|---|---|
| नैवेद्य | पद्माकर निमदेव | २– ० |
| त्रिवेणी | साने गुरुजी | १– ४ |
| तरंग | य. गो. जोशी | १– ४ |
| पाकळ्या | वि. स. खांडेकर | १– ८ |
| दिव्यावरती अंधार | अनंत काणेकर | १–१२ |
| परिस आणि लोखंड | शं. गो. गोखले | १– ८ |
| फरारी | राजरत्न वा. वि. जोशी | २– ० |
| नवी वसाहत | प्रा. भा. म. गोरे | २– ० |
| अर्धवर्तुळें | प्रभाकर पाध्ये | २– ८ |
| आराधना | वि. वा. पत्की | ३– ० |
| पाल्हाळ | प्रा. चिं. वि. जोशी | २– ० |
| शृंगार | सुमनबन्धु | ३– ० |
| आशीर्वाद | ल. रा. गोडबोले | १– ० |

### ● काव्य ●

| | | |
|---|---|---|
| झांशीची संग्रामदेवता | कै० दु. आ. तिवारी | १– ४ |
| ज्ञानेशांची अमृतवाणी | प्रा. ह. श्री. शेणोलीकर | ३– ० |
| मराठ्यांचीं संग्रामगीतें | कै० दु. आ. तिवारी | २– ० |
| विशाखा | कुसुमाग्रज | २– ८ |
| जीवन–प्रभा | द. दा. पेंडसे | १– ० |
| प्राची | प्रा. गो. म. कुलकर्णी | १– ८ |
| गुंजन | सौ. उषा सुलाखे | १– ८ |
| शिवचरित्रप्रदीप | वि. ना. पुराणिक | ०– ६ |
| नवधारा | संपादित | १– ४ |
| अस्मिता | शि. अ. लुकतुके | २– ० |
| कागदी पुंग्या | सदाशिव आठवले | १–१२ |
| मेघदूत | ग. नी. कात्रे | १– ८ |

● ● स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर ● ●

## आमचीं कांहीं पुस्तकें

### टीका व साहित्यचर्चा

| पुस्तक | लेखक | रु. आ. |
|---|---|---|
| हरिभाऊ | डॉ. ल. म. भिंगारे | १०– ० |
| मराठी-स्त्री | डॉ. दु. का. संत | १०– ० |
| हॅम्लेट | प्रा. स. रा. गाडगीळ | २– ० |
| रसग्रहण | प्रा. गो. म. कुलकर्णी | ३– ८ |
| साहित्य आणि संसार | प्रा. ना. सी. फडके | १–१२ |
| गोकर्णीचीं फुलें | वि. स. खांडेकर | २– ८ |
| आस्वाद | प्रा. द. सी. पंगु | २– ८ |
| साहित्याचें मूलधन | आचार्य काका कालेलकर | १– ४ |
| तुषार | प्रा. द. सी. पंगु | २–१२ |
| कोंदणें | प्रा. ना. सी. फडके | ३– ० |
| प्राचीन मराठी कविपंचक | प्रा. द. सी. पंगु | २– ८ |
| तीन तपस्वी | प्रभाकर पाध्ये | २– ० |
| साहित्य आणि संस्कृति | डॉ. दु. का. संत | ३– ० |
| खांडेकर चरित्र आणि वाङ्मय | प्रा. मा. का. देशपांडे | ३– ८ |
| कलानीतिवाद | प्रा. संत व प्रा. गाडगीळ | २– ० |
| प्राचीन मराठी वाङ्मयाचें स्वरूप | प्रा. ह. श्री. शेणोलीकर | २– ८ |
| वाङ्मयविलास | ग. त्र्यं. माडखोलकर | २– ० |
| माझें वाङ्मयीन जीवन | काव्यविहारी | २– ८ |

### संकीर्ण

| पुस्तक | लेखक | रु. आ. |
|---|---|---|
| मानसमंदिर | प्रा. ना. सी. फडके | २– ८ |
| झांशीची राणी | वि. वा. हडप | २– ० |
| आमचे मतभेद | सात्यकी | ०– ८ |
| बालकोश भा. १ ला | ग. रं. भिडे | ६– ० |
| हिरवळ | वि. स. खांडेकर | १– ४ |
| मुक्तेश्वर-वनपर्व | प्रा. द. सी. पंगु | ४– ८ |
| सेंट्रिफ्यूगल पंप | ल. वि. पुसाळकर | २– ८ |
| डिझेल आणि सेमि-डिझेल इंजिन्स | ल. वि. पुसाळकर | २– ८ |

स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

## ● ● ● आमचीं कांहीं पुस्तकें ● ● ●

### ● संकीर्ण ●

| | | रु. आ. |
|---|---|---|
| गलोल | शामराव ओक | २– ० |
| भरतकामाच्या आदर्श कलाकृति भा. १ व २ | चित्रकार ग. वि. वडेर | २– ४ |
| अर्वाचीन पंचकन्या | बा. गो. नाईक | २– ० |
| स्वल्पविराम | र. कृ. फडके | १– ० |
| रा. ब. कानें व साने. | ग. र. इनामदार | २– ८ |
| मनाचे संकल्प | प्रा. स. ना. अदवंत | २– ८ |
| रुखरुख | वा. शि. आपटे | २– ० |
| नव्या जगासाठीं शिक्षण | डॉ. मारिया मॉन्टेसोरी | २– ० |
| अभिनयकला | दा. बा. मिरजकर | ०–१२ |
| सावरकरसूत्रें | ग. रं. भिडे | ०– ८ |
| बुद्धिबळक्रीडारत्नें | ग. रं. कुलकर्णी | ३– ४ |
| कागदी होड्या | बा. भ. बोरकर | ०–१२ |
| हिंदुस्थानची सामाजिक उत्क्रांति | द. रा. कानेगांवकर | २– ० |
| लघुरत्नपरीक्षा | म. ल. खांबेटे | ४– ० |
| डॉ. बाळकृष्ण चरित्र व आठवणी | संपादक मो. रा. वाळंबे | ३– ८ |
| श्रीबसवेश्वरचरित्र | डॉ. माईणकर व रा. द. गुरव | १– ८ |
| आरोग्यमंजरी | डॉ. गो. अ. ताम्हणकर | २– ८ |
| त्रिमितिपट आणि विशाल पडदा | इसाक म. मुजावर | ०– ८ |
| सकस आहार | श्री. ज. बापट | १– ० |
| व्यायामाचा अभ्यास | गुत्ते व गुरव | २– ० |
| आरोग्यसाधन | श्री. ज. बापट | १– ० |
| ज्ञानेश्वरी अध्याय १ ला | प्रा. द. सी. पंगु | ३– ० |
| ज्ञानेश्वरी अध्याय १५ वा | प्रा. द. सी. पंगु | ४– ८ |
| साम्राज्य कीं स्वराज्य | दा. न. शिखरे | १– ० |
| सीतास्वयंवर–बीडकर | प्रा. द. सी. पंगु | ४– ० |
| श्रीकरवीरमाहात्म्य | कै. दाजीबा जोशीराव | ५– ० |

● ● स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर ● ●